महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः २९, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार १५ ऑक्टोबर २०२४ ते सोमवार २१ ऑक्टोबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

# राज्य सरकारचा मोठा निर्णय; मुंबईच्या 'या' टोल नाक्यांवर हलक्या वाहनांना टोलमाफी

■ मुंबई : विशाल कारंडे

मुंबईत प्रवेश करणाऱ्या पाचही टोल नाक्यांवर लहान मोटर वाहनांना संपूर्ण टोल माफी करण्यात आली आहे. १४ ऑक्टोबर २०२४ रात्री बारा वाजल्यापासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मोठा निर्णय मानला जात आहे. वाशी, मुलुंड पूर्व-पश्चिम, ऐरोली, दहीसर हे मुंबईतील टोलनाके आहेत. या टोलनाक्यांवरून जाताना लहान वाहनांवर टोलचा भार होता. परंतु, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाचही टोलनाक्यांवरून टोल घेतला जाणार नाही. या वर्षाच्या सुरुवातीला, या टोल नाक्यांवर



सरकारने लहान वाहनांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. आज रात्रीपासून लहान वाहनांकडून या हलक्या वाहनांचा टोल ४५ रुपये करण्यात आला होता.

(शेष पृष्ठ २ वर)

### आजच्या मंत्रिमंडळातील इतर निर्णय

- आगरी समाजासाठी महामंडळ (सामाजिक न्याय)
- समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (उच्च व तंत्रशिक्षण)
- दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेस मान्यता (जलसंपदा)
- आष्टी उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता (जलसंपदा)
- वैजापूरच्या शनीदेवगाव बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता (जलसंपदा विभाग)
- राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित (महसूल)
- पाचपाखाडी येथील जमीन ठाणे मनपास प्रशासकीय भवनासाठी (महसूल)
- खिडकाळी येथील जमीन हायब्रिड स्किल विद्यापीठासाठी विनामूल्य (महसूल)
- राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) २.० राबविणार
- पुणे मेट्रो रेल टप्पा-२ मधील रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता (नगर विकास)
- किल्लारीच्या शेतकरी सहकारी कारखान्याचे कर्ज व्याजासह माफ (सहकार)
- अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ (सहकार)
- मिरजच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात इमर्जन्सी मेडिसिनची ३ पदे (वैद्यकीय शिक्षण)
- खंड क्षमापित झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना (वैद्यकीय शिक्षण)
- मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा (मराठी भाषा)
- अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळासाठी अभ्यासगट
- उमेदसाठी अभ्यासगट (ग्राम विकास)
- कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव (कौशल्य विकास)

## संक्षिप्त

### अभिनेता अतुल परचुरेचं निधन, पु.लंची शाबासकी मिळवणारा हरहुन्नरी कलाकार काळाच्या पडद्याआड

■ मुंबई : गणेश बागडे

अभिनेता अतुल परचुरे यांचं निधन झालं आहे. व्यक्ती आणि वल्ली या नाटकात पु. ल. देशपांडे यांची भूमिका अतुलने साकारली आणि पु.ल. देशपांडे



यांनी ती पाहिली आणि अतुलला शाबासकी दिली होती. अतुल परचुरेंना कर्करोग झाला होता, त्यातूनही तो बाहेर आला होता, त्याच्या जिद्दीचं कौतुक झालं होतं. आज त्यांची प्राणज्योत मालवली आहे. त्याच्या मागे त्याची आई, पत्नी आणि मुलगी असं कुटुंब आहे. नाटक, सिनेमा, चित्रपट या सगळ्या माध्यमांमध्ये त्यांनी काम केलं आहे. अतुलला कर्करोग झाला हे ऐकून अनेकांना धक्का बसला होता. त्याने त्याच्या वेदना विविध मुलाखतींमध्ये सांगितल्या होत्या. अशात आता वेदना देणारी ही बातमी समोर आली आहे. अतुल परचुरेने त्याच्या अष्टपैलू अभिनयाच्या जोरावर रंगभूमी, छोटा पडदा, मालिका विश्व सगळंच गाजवलं. परचुरे यांना कर्करोग झाला होता. कापूस कोंड्याची गोष्ट, नातीगोती, तरुण तुर्क म्हातारे अर्क, व्यक्ती आणि वल्ली या नाटकांमधल्या त्यांच्या भूमिका चर्चेत राहिल्या. द कपिल शर्मा शो या कार्यक्रमातही अतुल परचुरे यांनी बराच काळ काम केलं.

### उद्धव ठाकरेंची प्रकृती बिघडली, रुग्णालयात दाखल

■ मुंबई : नितीन देवळेकर

शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची तब्येत बिघडली असून त्यांना विविध तपासण्या करण्यासाठी मुंबईतील रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. उद्धव ठाकरे यांच्यावर काही वर्षांपूर्वी ॲंजिओप्लास्टी करण्यात आली होती. ते आता पुन्हा एकदा रुग्णालयात दाखल झाल्यामुळे शिवसैनिक चिंतेत आहत. धमन्यांमधील ब्लॉकेज तपासण्यासाठी त्यांच्या



चाचण्या केल्या जात असल्याचं आयएएनएस या वृत्तसंस्थेने म्हटलं आहे. त्यांची ॲंजिओग्राफी देखील केली जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

उद्धव ठाकरे यांना बरं वाटत नसल्यामुळे रुग्णालयात नेण्यात आलं होतं. याआधी त्यांची ॲंजिओप्लास्टी देखील झाली आहे. त्यामुळे डॉक्टर हार्ट ब्लॉकेजशी संबधित व हृदयाशी संबंधित इतर तपासण्या करत आहेत. ॲंजियोग्राफीमद्वारे हार्ट ब्लॉकेज तपासता येतात. ॲंजिओग्राफीत हार्ट ब्लॉकेज आढळले तर त्यांच्यावर पुन्हा एकदा ॲंजिओप्लास्टी व इतर उपचार केले जाऊ शकतात.

# आधी महायुतीचा 'चेहरा' जाहीर करा!

## मुख्यमंत्रीपदाच्या नावाबाबत उद्धव ठाकरे यांचे आव्हान

■ मुंबई : यश सावंत

मुख्यमंत्री पदावरून महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत. प्रथम सत्ताधारी महायुतीने आपला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करावा, त्यानंतर महाविकास आघाडी आपला चेहरा जाहीर करेल, असे आव्हान शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी दिले. सर्वाधिक आमदार असतानाही भाजपने मुख्यमंत्रीपद का सोडले, असा सवालही त्यांनी केला. विशेष म्हणजे ठाकरे हेच स्वत: मविआचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करावा, यासाठी आग्रही होते. महायुती सरकारच्या कारभाराबाबत 'गद्दारांचा पंचनामा' या महाविकास आघाडीने काढलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, उद्धव ठाकरे व कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते झाले. यावेळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदावरून महायुतीला वादात ओढले आहे. "महायुती सत्तेत आहे. त्यांचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण आहे? सर्वाधिक आमदार



असतानाही भाजपने मुख्यमंत्रीपद स्वत:कडे घेतले नाही. भाजपची यामागे भूमिका कोणती होती," असा सवाल ठाकरे यांनी केला. दसरा मेळाव्यात मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतानाची चित्रफीत दाखविण्यामागे कोणताही वेगळा हेतू नसल्याचे ते म्हणाले. भावी मुख्यमंत्री म्हणून पटोले यांचाही उल्लेख केला जात आहे. याबाबत कॉंग्रेस प्रदेशाध्यक्षांना विचारले असता "खुर्ची हा विषय आमच्यासाठी महत्त्वाचा नाही. आम्ही सारे एक आहोत. आमच्यात भांडणे होणार नाहीत. महायुतीचा पराभव करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे" त्यांनी सांगितले. मुख्यमंत्रीपदावर उद्धव ठाकरे व नाना पटोले यांनी मांडलेल्या भूमिकेशी आमचा पक्ष सहमत आहे, असा खुलासा शरद पवार यांनीही केला.

(शेष पृष्ठ २ वर)

# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणी आणखी एका आरोपीला अटक

## पोलिसांनी पुण्यातून घेतलं ताब्यात!

■ मुंबई : सम्यक कासारे

बाबा सिद्दीकी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर इतर दोन आरोपी फरार आहेत. दरम्यान, आता



याप्रकरणी फेसबूक पोस्ट करणाऱ्या शुभम लोणकर नावाच्या एका संशयित आरोपीच्या भावाला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. प्रवीण लोणकर (२८) असं या आरोपीचं नाव आहे. दोघेही भाऊ बाबा सिद्दीकी यांच्या हत्येच्या कटात सहभागी असल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. शनिवारी रात्री झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर या हत्येची जबाबदारी स्वीकारणारी एक फेसबुक पोस्ट शुबू लोणकर महाराष्ट्र या फेसबूक पेजवरून शेयर करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात होता. शुबू हा अकोला जिल्ह्याच्या अकोट येथील शुभम रामेश्वर लोणकर आहे, अशी माहिती पुढे आली होती. या दृष्टीने पोलीस तपास करत होते.या तपासादरम्यान पोलिसांनी त्याच्या अकोट येथील घरी दाखल झाले. मात्र, घराला कुलूप होतं. शेजाऱ्यांकडे विचारपूस केली असता, दोघेही भाऊ पुण्यात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या पुण्यातील घरी छापा टाकला. त्यावेळी शुभम लोणकर हा फरार असल्याचे त्यांच्या लक्षात आलं. तसेच पोलिसांनी त्याचा भाऊ प्रवीण लोणकरला अटक केली. हे दोघेही बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा कटात सहभागी होते, असा प्राथमिक अंदाज आहे. पोलीस आता शुभम लोणकर याचा शोध घेत आहेत. दरम्यान, याप्रकरणी आतापर्यंत तिघांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी पोलिसांनी वांद्रे येथून दोघांनी अटक केली होती. आता पुण्यातून आणखी एकाला अटक केली आहे. गुरुमीत सिंग आणि धर्मराज कश्यप असं आधी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. यापैकी गुरुमीत सिंग हा हरियाणाचा, तर धर्मराज कश्यप उत्तर प्रदेशातील रहिवासी आहे.

# विधानसभेसाठी रिपाइंला हव्यात १२ जागा; जागा न दिल्यास प्रचार नाही, रिपाइंची भूमिका

■ पुणे : अभिजीत येरल्लू

महायुतीचा घटक पक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाने विधानसभेसाठी बारा जागांवर दावा केला आहे. निवडणुकीत पक्षाला प्रतिनिधित्व दिले नाही तर, निवडणुकीचा प्रचारही केला जाणार नाही, अशी भूमिका रिपाइंचे राज्य संघटक परशुराम वाडेकर यांनी घेतली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाडेकर यांनी सोमावारी पत्रकारांशी संवाद साधला. या बारा जागांपैकी शहरातील पुणे कॅन्टोन्मेंट या मतदारसंघ मिळावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. सत्ता मिळवायची असेल तर,तडजोड करणे आवश्यक आहे, या विचारातून



आंबेडकरी चळवळीच्या विचारधारेच्या विरोधी असलेल्या राजकीय पक्षांशी युती करण्याचे धैर्य केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दाखवले. मात्र, या निर्णयाचा फायदा चळवळीतील नेते, कार्यकर्त्यांना कमी आणि भाजपला अधिक होत असल्याचे गेल्या १५ वर्षातील चित्र आहे.


(शेष पृष्ठ २ वर)

# धारावीतील सर्व अपात्र झोपडीवासीयांना घरे!

## शासनाकडून धोरण जाहीर

■ मुंबई : गणेश बागडे

झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये आतापर्यंत १ जानेवारी २०११ नंतरचे झोपडीवासीय घरांसाठी पात्र होत नव्हते. परंतु धारावी पुनर्विकासात पात्र व अपात्र वा बहुमजल्यांवरील सर्वच झोपडीवासीयांना घरे देण्यात येणार आहेत.



सध्या सर्वेक्षण सुरू असून सुमारे दोन लाख अपात्र झोपडीवासीय असल्याचा दावा करण्यात येत आहे. या सर्वांना भाडेतत्त्वावर घरे देण्यात येणार आहेत. याबाबत सरकारने धोरण जाहीर केले असून हे धोरण फक्त धारावीपुरते मर्यादित असल्याचे स्पष्ट केले आहे. याबाबत किती भाडे आकारावे याचा निर्णय धारावी पुनर्विकास प्राधिकरणावर सोपविण्यात आला आहे. अपात्र झोपडीवासीयांना भाडेतत्त्वावर घरे वितरित झाली तरी ती संबंधित झोपडीवासीयांना विकत देण्याचे प्रस्तावीत असल्याचे या पुनर्विकासाशी संबंधित उच्चपदस्थाने सांगितले. धारावीतील झोपडीवासीयांचे सध्या सर्वेक्षण सुरू आहे. त्यानंतरच पात्र व अपात्र झोपडीवासीय किती आहेत, याची निश्चित माहिती मिळणार आहे. तळ अधिक वरील मजल्यावरील झोपडीवासीयांचेही सर्वेक्षण होणार असून ते अपात्र ठरले तरी त्यांना घरे मिळणार आहेत, असेही या सूत्रांनी स्पष्ट केले.

(शेष पृष्ठ २ वर)

# नवी मुंबई मनपा परिवहन विभागातर्फे महिलाना बस तिकीट दरात ५० टक्के सवलत

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

**महानगर पालिकेच्या परिवहन उपक्रमातील सर्व प्रकारच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय नवी मुंबई मनपाकडून मंजूर करण्यात आला आहे. नवी मुंबईतील महिलांना परिवहन बसेस मधून प्रवास करताना सवलत देण्यात यावी अशी मागणी महिला प्रवासी, सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींकडून वारंवार करण्यात येत होती.**

वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्र येथे आयोजित महाराष्ट्र भवन भूमी पूजन कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून नवी मुंबईतील महिलांना मनपाच्या परिवहन बसमधून प्रवास करताना ५० टक्के सवलत मिळण्याबाबत नवी मुंबई मनपा आयुक्तांना सूचना देण्यात आल्या होत्या. या सूचनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या 'महिला सशक्तीकरण' या अभियानाच्या संकल्पनेतून व महिला सन्मानार्थ तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे नवी मुंबई मनपा परिवहन विभागातर्फे सांगण्यात आले आहे. या संदर्भातील प्रस्ताव नवी मुंबई परिवहन विभागाकडून नवी मुंबई मनपाकडे मांडण्यात आला होता. त्याला महानगर पालिका अधिनियम कलम ३४३(१) अन्वये नवी मुंबई मनपा आयुक्तांकडून मंजूरी देण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात व हद्दीबाहेर मुंबई, बोरिवली, ठाणे, डोंबिवली, कल्याण, दहिसर, अंबरनाथ, बदलापूर,



पनवेल, उलवे नोड, खोपोली, कर्जत व वाशिवली / रसायनी या विभागात ४० सर्वसाधारण व ३७ वातानुकूलीत अशा एकूण ७७ विविध बसमार्गावर प्रवासी सेवा देण्यात येत आहे. त्यानुसार दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ पासून नवी मुंबई महानगर पालिका परिवहन उपक्रमांतर्गत चालणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस मधून प्रवास करताना महिलांना तिकीट दरांत ५० टक्के सवलत मिळणार आहे. तसेच महिलांना देण्यात येणारे ५० टक्क्यांचे सवलत तिकीट ईटीएम माशीनमध्ये देखील उपलब्ध असणार असल्याची माहिती परिवहन विभागाकडून जारी करण्यात आलेल्या परिपत्रकात नमूद करण्यात आली आहे. यामुळे येत्या काळात नवी मुंबईच्या परिवहन उपक्रमांतर्गत चालणाऱ्या बसेसमधून प्रवास करताना महिलांचा प्रवास सुखकर होणार असल्याचे महिलांकडून म्हटले जात असून महिला प्रवाशांच्या टक्का वाढण्याची शक्यता परिवहन विभागाकडून वर्तवली जात आहे.

# बीकेसीतील आणखी तीन भूखंडांचा ई-लिलाव, एमएमआरडीएकडून निविदा प्रसिद्ध


■ मुंबई : गणेश बागडे

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) वांद्रे-कुर्ला संकुल येथील आणखी तीन भूखंडांचा ई लिलाव करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शनिवारी तीन व्यावसायिक वापरासाठीच्या भूखंडांच्या ई लिलावासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. तीन व्यावसायिक वापराच्या भूखंडांच्या ई लिलावातून एमएमआरडीएला किमान ६५६ कोटी रुपये इतका महसूल मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, यापूर्वी एमएमआरडीएने बीकेसीतील सात भूखंडांच्या ई लिलावासाठी निविदा प्रसिद्ध केल्या असून निविदा प्रक्रिया सुरु आहे. या सात भूखंडांच्या विक्रीतून एमएमआरडीएला ५९४६ कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. एमएमआरडीएकडून सध्या एक लाख कोटींहून अधिकचे पायाभूत सुविधा प्रकल्प मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात राबविले जात आहेत.




मेट्रोसह अनेक प्रकल्पांचा यात समावेश असून या प्रकल्पांच्या निधीची पूर्तता कर्ज आणि दुय्यम कर्जाच्या माध्यमातून एमएमआरडीएला करावी लागत आहे. एमएमआरडीएच्या तिजोरीत खडखडाट असल्याने एमएमआरडीएला कर्जाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे एमएमआरडीएच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर वाढला असून हा डोंगर आता दीड लाख कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे. एमएमआरडीएच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत भूखंडाचा ई लिलाव आहे. त्यामुळे आता निधी पूर्ततेसाठी एमएमआरडीएने भूखंड विक्रीवर भर दिला आहे. त्यानुसार काही महिन्यांपूर्वीच बीकेसीतील सात भूखंडांच्या ई लिलावासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. दरम्यान, एमएमआरडीएकडून काही वर्षांपूर्वी बीकेसीतील काही भूखंडांच्या ई लिलावाचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे या प्रयत्नात एमएमआरडीएला यश येत नव्हते.

(शेष पृष्ठ २ वर)





# नीतिमूल्यांचा 'ताज'

झोरास्ट्रियन नीतिशास्त्रातील हे वचन सांगते, की देवाने हे विश्व निर्माण केले आहे ते काम करण्यासाठी. तुम्ही अथक परिश्रम करता तेव्हा त्या 'निर्मिका'चे कामच पुढे नेत असता. रतन टाटा यांचे सारे आयुष्य पाहिले तर या शिकवणीचा संस्कार नक्कीच त्यांच्यात मुरलेला दिसतो. उद्योजकता, कर्तव्यनिष्ठा, आशावाद आणि भविष्यवेधी विचार यांची कास त्यांनी अखेरपर्यंत कधीही सोडली नाही.

अनेक आव्हाने उभी ठाकली, चढउतार आले, कधी अपयशाचीही ठेच लागली तरी प्रयत्नवाद न सोडण्याची ऊर्जा त्यांना जशी सभोवतालच्या वातावरणातून मिळाली असेल, तशीच ती अशा शिकवणीतूनही मिळाली असणार. काही व्यक्ती अशा असतात, की त्या अनेक उपाध्या मिरवतात; पण त्यांना पूर्ण न्याय देत नाहीत. याउलट काही व्यक्ती अशा असतात, की त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या उपाधीमध्येही पूर्ण मावत नाही. 'उद्योगपती' रतन टाटा हे असेच उपाधीत न मावणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी टाटा समूहाची उज्ज्वल परंपरा पुढे नेली.

देशाला स्वातंत्र्य मिळाले, त्या वेळी अगदी कोवळ्या वयात असलेले रतन टाटा यांनी पुढच्या काळात उद्योग चालवले, समूहाचा पसारा वाढवला आणि आपला नावलौकिक सातासमुद्रापारही नेला. देशउभारणीच्या ध्येयाशी ते पूर्णपणे समरस झाले होते. आधुनिक आणि विकासोन्मुख भारताची वाटचाल आणि त्यांची कारकीर्द यांना वेगळे करताच येणार नाही. खरे तर ते टाटा घराण्याचेच वैशिष्ट्य होते; अगदी



जमशेटजी टाटा यांच्यापासून. जेआरडी टाटांनी उद्योग आणि संस्थाउभारणीत बजावलेली कामगिरी ऐतिहासिकच होती. स्वातंत्र्यानंतर देशाची गरज होती, ती पायाभूत उद्योगांसाठी मोठ्या भांडवली गुंतवणुकीची. टाटांचा पोलादाचा कारखाना, हे त्याचे ठळक उदाहरण.

पुढे १९९१मध्ये उदारीकरणाचा टप्पा हे एक मोठे स्थित्यंतर घडले. अर्थव्यवस्थेवरील नियंत्रणाकडून खुलीकरणाकडे, मक्तेदारीकडून स्पर्धेकडे जाणारे हे परिवर्तन होते. रतन टाटा यांचा उद्योग क्षेत्रातील बहराचा काळ उदारीकरणाच्या या टप्प्यावर सुरू होणे हा एक विलक्षण योग म्हटला पाहिजे. परकी कंपन्यांना आपली दारे सताड उघडी करून देणे म्हणजेच केवळ जागतिकीकरण नव्हे. आपल्यालाही आता आकाश मोकळे झाले आहे, हे जाणून रतन टाटा यांनी जॅग्वार, लँडरोव्हर हे वाहन उद्योगातील ब्रँड, तर 'टेटली' ही चहाच्या क्षेत्रातील कंपनी विकत घेतली. जगभरात टाटा हे नाव दुमदुमते ठेवले. काळाची पावले ओळखून त्यांनी आपल्या उद्योगांत अनेक बदल केले. सिमेंट, कापड, सौदर्यप्रसाधने, औषधे याऐवजी सॉफ्टवेअर, दूरसंचार, प्रवासी वाहने, वित्तसेवा, विमा, हवाई वाहतूक अशा उत्पादन-सेवांवर लक्ष केंद्रित केले.

टाटा समूहातील वेगवेगळ्या कंपन्यांकडून नाममुद्रेचे स्वामित्वशुल्क घेण्याची कल्पना त्यांचीच. त्या सगळ्यांना नाममुद्रेच्या एका छत्राखाली आणताना 'ब्रँड'चे माहात्म्य त्यांनी अधोरेखित केले. ते नुसते शब्दांपुरते नव्हते, त्यामागे कार्यसंस्कृती होती. व्यवस्थापनातील नीतिमूल्ये होती. 'उद्योगांचे सामाजिक उत्तरदायित्व' ही कल्पना येण्याआधीपासून टाटांच्या कार्यप्रणालीत ती स्वाभाविकपणे भिनलेली होती. रतन टाटा यांनी त्याबाबतीतही आपला ठसा उमटवला.

एक लाखात मोटार निर्माण करण्याची कल्पना साकारत अनेक मध्यमवर्गीयांच्या स्वप्नांचे रतन टाटा आनंदाने भागीदार बनले. आपल्या उद्योगसमूहाची उलाढाल त्यांच्या काळात चार अब्ज डॉलरवरून शंभर अब्ज डॉलरपर्यंत पोचली. या सगळ्याची जंत्री मोठी आहे, पण त्या पलीकडे होते ते त्यांचे माणूस म्हणून मोठेपण. एवढी यशस्वी आणि संपन्न कारकीर्द असलेल्या या उद्योगपतीने स्वतःचे प्रस्थ निर्माण होऊ दिले नाही.

पिंपरी-चिंचवडमधील 'टाटा मोटर्स' येथे आले असताना जेवणासाठी कॅंटिनमध्ये कामगारांबरोबर ते रांगेत राहिले आणि कामगारांबरोबरच त्यांनी जेवण केले. ती आठवण आजही त्या कामगारांच्या मनात घर करून आहे. टाटांचा यातला सहजपणा जास्त महत्त्वाचा. २६/११ला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात उद्ध्वस्त झालेले 'ताज' हॉटेल त्यांनी उभे केलेच; पण या भीषण घटनेत सापडलेल्यांना मदत करताना 'गेटवे ऑफ इंडिया'जवळ चणे-फुटाणे विकणाऱ्या गरीब मुलांनाही मदत करायला ते विसरले नाहीत. रतन टाटांसारखी माणसे पुन्हा पुन्हा आठवायची याचे कारण यश मिळविण्यासाठी नीतिमूल्ये सोडण्याची गरज नसते, हे त्यांच्याकडून शिकायला मिळते.

श्रेयाचा वाटा सहकाऱ्यांना दिल्याने तुमचे महत्त्व कमी होत नाही, उलट वाढते, याचे उदाहरण ते घालून देतात. उद्योगधंद्यांना परवानग्या मिळवण्यासाठी राजकारण्यांची खुशामत करण्याची गरज नसते, याची ग्वाही त्यांच्याकडून मिळते. संपत्तीनिर्माण हेही कर्तृत्व गाजवण्याचे एक चांगले, उदात्त आणि महत्त्वाचे कार्यक्षेत्र आहे, हे तर ते मनावर बिंबवतातच; पण मिळालेल्या संपत्तीचा विनियोग करण्यातही तेवढीच कल्पकता आणि सर्जनशीलता असावी लागते, याचाही वस्तुपाठ देतात. श्रीमंती आपल्यावर स्वार होऊ न देता आपण तिच्यावर स्वार होत आपले माणूसपण समृद्ध करू शकतो, हा विचारही आपल्या कृतीतून रतन टाटांसारख्या व्यक्ती देत असतात. या 'समृद्ध महामार्गा'ने वाटचाल करणे, निदान तसा प्रयत्न करणे हेच त्यांचे सर्वात सार्थ स्मरण ठरेल.



# मुंबई महानगरीत समाजकंटकांचा धुमाकूळ

**महायुतीचा कारभारावर टीकेचे मोहोळ उठणार हे निश्चित आहे. केवळ दोन-तीन आठवडे विद्यमान सरकारचा कालावधी उरलेला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या लौकिकाला गेल्या काही दिवसातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या घटनांनी गालबोट लावले आहे. कार्यक्षम व्यावसायिक दल म्हणून ओळख असलेले मुंबई पोलीस सूचना मिळालेली असतानाही एका महत्त्वाच्या माणसाचा प्राण वाचवू कसे शकले नाहीत, हा मुद्दा भयावह आहे.**

मुंबईत केव्हा काय घडेल हे सांगणे कठीण. चाकरमाने जीव मुठीत घेऊन जगतात अन् धनदांडगे मुंबई मुठीत ठेवण्यासाठी तनमनधनाने काम करतात. सत्तारूढ महायुतीशी जवळीक साधलेल्या एका माजी मंत्र्याला गोळ्या झाडून मारले गेले; तेदेखील निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली असताना! 'वाय' सुरक्षा दिमतीला असलेल्या बाबा सिद्दीकींना गोळ्या घालून टिपले गेले. या घटनेला अनेक पदर आहेत.

'ऐ जान बचके...' सांगणाऱ्या बॉलिवुडी वर्तुळात बाबांची उठबस. ज्येष्ठ अभिनेते आणि हाडाचे कॉंग्रेसी सुनील दत्त यांच्या देखरेखीत तयार झालेल्या मोजक्या पण तळमळीच्या कार्यकर्त्यांपैकी ते एक होते. मुंबईत राजकारणी, सिनेव्यावसायिकांचे जागांचे व्यवहार करणारे आणि बांधकामातील शार्क यांचे जे काय साटेलोटे आहे, ते मती गुंग करणारे आहेत. बाबा सिद्दिकी अनेक वर्षे राजकारणात आहेत.

घडवला, तो बाबा सिद्दिकींनी. स्वतःच्या पदाचा वापर करून कित्येकांना मदत करत. वेळप्रसंगी व्यवस्था वाकवत. बाबा सिद्दिकी यांना धमकी आल्यानंतरही त्यांचे प्राण सरकारला वाचवता आले नाहीत. ही हादरवणारी बाब आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था गेल्या काही महिन्यात ढासळली आहे. बलात्काराच्या घटनांत वाढ होतेय. आता तर निवडणुका जवळ येत असताना राजकीय हत्यांचे प्रकार घडू लागले आहेत. अशा रीतीने घडलेल्या या हत्येमुळे गृहखाते सांभाळणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांचा राजीनामा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मागितला आहे. महायुतीचा कारभारावर टीकेचे मोहोळ उठणार हे निश्चित आहे. केवळ दोन-तीन आठवडे विद्यमान सरकारचा कालावधी उरलेला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या लौकिकाला गेल्या काही दिवसातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या घटनांनी गालबोट लावले आहे. कार्यक्षम व्यावसायिक दल म्हणून ओळख असलेले मुंबई पोलीस सूचना मिळालेली असतानाही एका महत्त्वाच्या माणसाचा प्राण वाचवू कसे शकले नाहीत, हा मुद्दा भयावह आहे. वादात अडकलेल्या नियुक्त्या

मुंबई पोलीस दलात होत असलेल्या नेमणुका हा कायम वादाचा मुद्दा. अनिल देशमुख महाविकास आघाडी सरकारमध्ये गृहमंत्री असताना जे आरोप-प्रत्यारोप झाले ते अद्याप जनतेच्या विस्मृतीत गेलेले नाहीत. 'दोन- दोन आयुक्त शहरात असताना अशा हत्या होतात कशा', असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी केला आहे. मुंबईसारख्या महानगरात कोणीही येते आणि कोणालाही टिपून जातं हा प्रकार अत्यंत धक्कादायक आहे.

राज्यातील पोलीस दलाच्या प्रशासनक्षमतेवर प्रश्न निर्माण करणारा आहे. घटना घडल्यानंतर केवळ काही तासांतच मुंबई पोलिसांनी त्यांनी दोन आरोपी कसे पकडले, त्या दोन आरोपींनी पिस्तुल कुठून आणले, डिलिव्हरी बॉयने कशाप्रकारे हे पिस्तूल एक दिवस आधीच पोचवले याच्या बातम्या माध्यमापर्यंत पोहोचवण्यात कोणतीही कसूर सोडलेली नाही.

अशीच काळजी त्यांनी केवळ काही दिवस आधी घेतली असती तर कदाचित एक जीव वाचला असता. प्रश्न पडतो तो पोलीस दलातील व्यावसायिकतेचा. कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक झाल्यानंतर तो कोणाचा, त्याला कोणी नेमले, त्यामागचे रहस्य काय, असे अनेक प्रश्न दुर्दैवाने मुंबईत उपस्थित होतात. हे लाजिरवाणे नव्हे काय? समाजकंटकांना मोकळे रान तर मिळाले नाही ना, असा प्रश्न विचारायची वेळ आलेली आहे. आमदार आणि बांधकामव्यावसायिक यांची हातमिळवणी लपलेली नाही. कधीकाळी जे लोकप्रतिनिधी बांधकाम व्यवसायिकांच्या वृत्तीवर आक्षेप घेत असत तेच नंतर त्यांचे भागीदार होऊ लागले आणि या मुंबईकडे केवळ 'रिअल इस्टेट' या भूमिकेतून पाहिले जाऊ लागले. मुंबईत अशाप्रकारे नेत्यांचा खून होणं हे नवं नाही.

विठ्ठल चव्हाण असतील रामदास नायक असतील, प्रेमकुमार शर्मा असतील, किंवा अभिषेक घोसाळकर असतील, या साऱ्यांनी अभद्र युतीमुळेच कुठेतरी आपलं जीवन गमावले. सिद्दीकी यांची हत्या बिष्णोई टोळीने घडवून आणली, असा आरोप केला जात असला तरी प्रत्यक्षात तो खराच खरा आहे ना, की ही काही धूळफेक आहे, याचा बारकाईने तपास करावा लागेल.

गेले काही दिवस ज्या काही चर्चा सुरू होत्या, त्या चर्चांनुसार बाबा सिद्दिकी यांचे पुत्र झीशान सिद्दिकी यांच्या मतदारसंघात कित्येक कोटी रुपयांची विकासकामे मंजूर झाली होती. त्या विकासकामांचा लाभ मिळू न शकलेल्या एखाद्या नाराज कंत्राटदाराने हा प्रकार केला का, अशीही शंका घेतली जाते. ते तपासावे लागेल. सरकार कोणाचंही असो; गृहमंत्री कोणीही असो, मुंबईतील ही दुरवस्था ताबडतोब संपायला हवी. ती संपवण्यासाठी जी कोणती पावलं उचलायची असतील ती उचलावीत. महानगराचा चेहरा हा 'कार्यसंस्कृतीचे शहर' असाच असला पाहिजे; टोळीचे राज्य चालणाऱ्या शहराचा नव्हे!

पान १ वरुन...

## राज्य सरकारचा मोठा...

दर तीन वर्षांनी टोलवाढीच्या नियमांतर्गत ही वाढ करण्यात आली होती. सन २००० पासून, मुंबईत ये-जा करणारे लोक शहराच्या प्रवेशद्वारावर टोल शुल्क भरत आहेत. शहरातील उड्डाणपुलांच्या बांधकामाशी संबंधित खर्च भरून काढण्यासाठी महाराष्ट्र सरकारने टोल लागू केला होता. दरम्यान, निवडणुकीची आचारसंहिता केव्हाही लागू होऊ शकते हे गृहीत धरून महायुती सरकारने राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये निर्णयांचा सपाटा लावला आहे. गेल्या महिनाभरात १६५च्या आसपास निर्णय घेण्यात आले आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या गुरुवारी झालेल्या बैठकीत सुमारे ४० निर्णय घेण्यात आले. २३ सप्टेंबरला झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निवडणुकीच्या दृष्टीने विविध २२ निर्णय घेण्यात आले होते. त्यानंतर ३० सप्टेंबरला झालेल्या बैठकीत ५६ निर्णय घेण्यात आले होते. ४ ऑक्टोबरच्या मंत्रिमंडळ बैठकीत ४७ निर्णय झाले होते. १५० पेक्षा अधिक निर्णय घेऊन महायुती सरकारने समाजातील विविध घटकांना खूश करण्याचा प्रयत्न केला आहे. याच वेळी महिनाभरात शासनाच्या वतीने विविध हजारच्या आसपास शासकीय आदेश (जी.आर.) काढण्यात आले. आजही मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली असून आजही सरकारच्या विविध घोषणांकडे राज्याचं लक्ष लागून आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, लाडका भाऊ, मुख्यमंत्री युवा कौशल्य अशा विविध योजनांमुळे राज्य सरकारवर आर्थिक बोजा आला आहे. सुमारे दोन लाख कोटींची आर्थिक तूट असताना मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये विविध समाज घटकांना खूश करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या निर्णयांमुळे निधीची तरतूद करणार कशी, असा प्रश्न वित्त खात्याला पडला आहे. यामुळेच प्रत्येक प्रस्तावावर वित्त विभागाकडून दोन लाख कोटींची वित्तीय तूट आणि सुमारे आठ लाख कोटींच्या कर्जाची आठवण करून देण्यात येते.

## आधी महायुतीचा...

कायदा सुव्यवस्थेपासून महायुतीचे सरकार सर्वच आघाड्यांवर अपयशी ठरले आहे. सध्याच्या सत्ताधाऱ्यांमुळे प्रशासनही हतबल झाले आहे. पैशांच्या उधळपट्टीवर प्रशासनाने खंबीर भूमिका घेतल्याची माहिती आहे. मात्र त्याकडेही दुर्लक्ष केल्याचा आरोप पवार यांनी केला. निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने विविध निर्णय घेण्याचा सपाटा लावला आहे. पण एवढ्या कमी वेळेत या निर्णयांची अंमलबजावणी कशी होणार, असा सवालही त्यांनी केला. विविध जातींना खूश करण्यासाठी विविध महामंडळे नव्याने निर्माण केली जात आहेत. पण आधीच बरीच महामंडळे तोट्यात असल्याचे सांगत मविआ सरकारच्या काळात काही मंडळे बंद करण्यात आल्याकडे पवार यांनी लक्ष वेधले.

## विधानसभेसाठी रिपाइंला...

यामुळे आंबेडकरी समाजात नाराजीचे वातावरण आहे. लोकसभेला रिपाइंला संधी नाही मिळाली. विधानसभा निवडणुकीत किमान १२ जागा मिळाव्यात ही पक्षाची भाजपकडे मागणी आहे. पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव असून यामध्ये आंबेडकरी समाजाची मते निर्णायक आहेत, यामुळे हा मतदारसंघ मिळावा, अशी मागणी भाजपकडे करण्यात आल्याचे वाडेकर यांनी स्पष्ट केले. भाजपने आंबेडकरी चळवळीतून आलेल्या रिपाइंच्या कार्यकर्त्याला उमेदवारी दिली तर, आंबेडकरी समाजात महायुतीबद्दल एक सकारात्मक संदेश जाईल. यामुळे महायुतीला पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर फायदा होईल, असा दावाही वाडेकर यांनी केला.

## धारावीतील सर्व अपात्र...

धारावीतील झोपडीवासीयांच्या संख्येबाबत वेगवेगळा आकडा दिला जात आहे. या पुनर्विकासात आता रेल्वे भूखंडावरील झोपडीवासीयांचाही समावेश झाला आहे. त्यामुळे ही संख्या वाढेल. फक्त पात्र झोपडीवासीयांना धारावीत घर दिले जाणार आहे. उर्वरित अपात्र झोपडीवासीयांना धारावीच्या बाहेर स्थलांतरित केले जाणार आहे. सर्वच अपात्रांना भाड्याची घरे दिली जाणार आहेत. याबाबत शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार, धारावीपासून दहा किलोमीटर परिसरात भाड्याची घरे धारावी पुनर्विकास प्रकल्प कंपनीने बांधावी, असे स्पष्ट केले आहे. या मोबदल्यात विकासकाला १.३३ चटईक्षेत्रफळ खुल्या विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुलुंड येथील ६३ एकर भूखंड शासनाने धारावी पुनर्विकासासाठी महापालिकेकडे मागितला आहे. या भूखंडावर पात्र व अपात्र झोपडीवासीयांसाठी घरे बांधली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आल्यामुळे धारावीकरांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. मात्र पात्र झोपडीवासीयांना धारावीतच घरे मिळणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

## बीकेसीतील आणखी...

त्यामुळे या तांत्रिक अडचणी दूर करून सात भूखंडांच्या ई लिलावासाठी ऑगस्टमध्ये नव्याने निविदा काढण्यात आल्या असून आता पुढील प्रक्रिया सुरु आहे. सात भूखंडांच्या ई लिलावातून एमएमआरडीएला ५९४६ कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. आता त्यात आणखी किमान ६५६ कोटींची भर पडण्याची शक्यता आहे. कारण बीकेसीतील आणखी तीन भूखंडांच्या ई लिलावासाठी शनिवारी एमएमआरडीएकडून निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. हे तिन्ही भूखंड व्यावसायिक वापराचे असून यातून एमएमआरडीएला किमान ६५६ कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. पहिला भूखंड ५११७.८५ चौ. मीटरचा असून हा भूखंड शैक्षणिक वापरासाठी राखीव आहे. या भूखंडाच्या ई लिलावासाठी १६४.८७ कोटी रुपये अशी बोली लावण्यात आली आहे.


**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
**ई -निविदा सुचना क्र. ५७ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) हे सक्षम व अनुभवी कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | मंत्रालय विस्तार इमारतीच्या ७ व्या मजल्यावरील संचालक माहिती व तंत्रज्ञान विभागाचे नुतनीकरण करणे. | १६३.७५ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ११.१०.२०२४ ते दि. १८.१०.२०२४ पर्यंत

निविदा पूर्व बैठक- दि. १५.१०.२०२४ (बैठकिचे ठिकाण अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय, ५ बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ वेळ : ३.०० वाजता)

ई-निविदा उघडणे- दि. २१.१०.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता

निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल. खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ १४४०३
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : १०/१०/२०२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४४३०



महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
इलाखा शहर विभाग, मुंबई-४०० ०२३.
शुध्दीपत्रक क्र. १

कामाचे नाव - चर्नी रोड मुंबई येथील जवाहर बालभवन इमारतीची दुरूस्ती व नुतनीकरण करणे. (प्रसाधनगृह, प्रेक्षागृह, फर्निचर इ.)

या कार्यालयाचे ई निविदा सूचना क्र. ५१/२०२४-२५ जा. क्र. इशवि/निविदा/१४०९५ दिनांक ४.१०.२०२४ अन्वये प्रसिध्द झालेल्या ई निविदा सुचनेमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तपशिल | पुर्वीचा तपशिल | सुधारीत तपशिल |
|---|---|---|---|
| १. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. ८.१०.२०२४ ते दि. १५.१०.२०२४ | दि. ८.१०.२०२४ ते दि. २१.१०.२०२४ |
| २. | निविदा पूर्व बैठक | दि. ११.१०.२०२४ | दि. १७.१०.२०२४ |
| ३. | ई-निविदा उघडणे | दि. १६.१०.२०२४ | दि. २२.१०.२०२४ |

निविदा सूचनेमधील इतर बाबींमध्ये काहीही बदल नाही.

जा.क्रं. इशवि/निलि/१४६०१
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- १४.१०.२०२४

कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४३८७


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# घामाच्या धारांमुळे वातानुकूलित लोकलमधील गर्दी वाढली; प्रवाशांना लोकल डब्यात लोटण्यासाठी कल्याण-डोंबिवली स्थानकात जवानांची दमछाक

**■ कल्याण : आकाश कांबळे**

**ऑक्टोबरमधील शरीराला घायाळ करणारी उष्णता सुरू झाली आहे. उकाडा, त्यात घामाच्या धारा अशा परिस्थितीत सामान्य लोकलमधून चेंगराचेंगरीत, घामाच्या धारा पुसत प्रवास करण्यापेक्षा बहुतांशी प्रवासी अलीकडे वातानुकूलित लोकलला पसंती देत आहेत.**

कल्याण, टिटवाळा, बदलापूर रेल्वे स्थानकांमधून सकाळच्या वेळेत सुटणाऱ्या वातानुकूलित लोकलना तुफान गर्दी असते. या गर्दीमुळे वातानुकूलित लोकलचे दरवाजे बंद होत नाहीत. या रेल्वे स्थानकांवरील महिला, पुरूष रेल्वे सुरक्षा बळाचे जवान, विशेष जवान यांना प्रवाशांना लोकल डब्यात लोटण्याची जबाबदारी दररोज पार पाडावी लागते. वातानुकूलित लोकलचे दरवाजे जोपर्यंत बंद होत नाहीत, तोपर्यंत लोकल सुरू होत नाहीत. वेळेत या लोकलचे दरवाजे बंद व्हावे म्हणून जवानांना वातानुकूलित लोकलच्या दरवाजात लटकत असलेल्या प्रवाशांना डब्यात कोंबण्यासाठी जवान सगळी ताकद लावत आहेत. वातानुकूलित लोकल सुरू होईपर्यंत जवानांची दमछाक होत आहे. वातानुकूलित लोकलमध्ये गर्दी असली तरी घामाच्या धारांचा त्रास, कपड्यांचा चिकचिकाट होत नाही. उकाडा होत नाही. किमान गार वातावरणात सुखाने प्रवास करता येतो, असा विचार करून प्रवासी गारेगार लोकलला पसंती देत आहेत. वातानुकूलित लोकलमधील वाढत्या गर्दीमुळे,



डब्यातील चेंगराचेंगरीमुळे तिकीट तपासणीस सकाळ, संध्याकाळच्या वेळेत या लोकलमध्ये तिकीट तपासणीसाठी फिरकत नाहीत. त्यामुळे सामान्य लोकलमधील प्रवासीही या लोकलमध्ये घुसखोरी करून प्रवास करतात, अशा प्रवाशांच्या तक्रारी आहेत.

डोंबिवली रेल्वे स्थानकातून एकदा नऊ वाजताच्या दरम्यान सीएसएमटीकडे वातानुकूलित लोकल गेली की त्यानंतर थेट सव्वा दहा वाजता कल्याणकडून सीएसएमटीकडे जाणारी वातानुकूलित लोकल आहे. डोंबिवली रेल्वे स्थानकातून साडे आठ ते नऊ वाजताच्या दरम्यान मुंबईच्या दिशेने प्रवास सुरू केला की कार्यालयीन वेळेत मुंबईत पोहचता येते. त्यामुळे नऊच्या वेळेतील वातानुकूलित लोकलला प्रवाशांची तुडुंब गर्दी असते. प्रत्येक प्रवाशाची नऊची वातानुकूलित लोकल पकडण्याची धडपड असते. त्यामुळे या लोकलचे दरवाजे बंद होतात की नाही याची पर्वा न करता प्रवासी वातानुकूलित लोकलमध्ये जीवतोड करून चढतात. अनेक प्रवासी दरवाजात लटकून राहतात. अशा प्रवाशांमुळे वातानुकूलित लोकलचा दरवाजा बंद होत नाही. दरवाजे बंद होत नाहीत तोपर्यंत वातानुकूलित लोकल सुरू होत नाही. त्यामुळे कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानकांवरील रेल्वे सुरक्षा बळाचे जवान, विशेष जवान प्रत्येक डब्याजवळ उभे राहून दरवाजात लटकत राहणाऱ्या महिला, पुरूष प्रवाशांना डब्यात ढकलण्याचे काम करत आहेत. हा त्रास आम्हाला मे, जूनपर्यंत सहन करावा लागतो.

# अत्याधुनिक साधनांमुळे सायबर गुन्हेगार आपल्यापेक्षा पुढे –देवेंद्र फडणवीस

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

सायबर गुन्हेगार आपल्यापेक्षा पुढे आहेत. कारण त्यांच्याकडे अत्याधुनिक साधने आहेत, अशा गुन्हेगारांना नैतिकतेशी काहीही देणे-घेणे नाही. त्यांच्याविरोधात आपल्याला लढायचे आहे असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवी मुंबई येथे पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प हा आमच्या स्वप्नातील प्रकल्प होता. जेवढी अर्थव्यवस्था वेगवान, डिजीटायझेशन होते. त्यासोबतच या क्षेत्रातील आव्हाने तितक्याच प्रमाणात वाढत जातात. आपण जर सजग राहिलो नाही. तर अनेकांची यामध्ये फसवणूक होऊ शकते. दुर्दैवाने सायबर गुन्हेगार आपल्यापेक्षा पुढे आहेत. कारण, त्यांच्याकडे अत्याधुनिक साधने आहेत, अशा गुन्हेगारांना नैतिकतेशी काहीही देणे-घेणे नाही असे फडणवीस म्हणाले. पूर्वी कायदा आणि सुरक्षेच्यावेळी खोटे कथानक तयार करून ते समाजमाध्यमांवर पसरवून दंगली घडविल्या जात होत्या. आम्ही ते तपासायला पाठविल्यानंतर तेथून माहिती येण्यासाठी किंवा तो संदेश थांबविण्यासाठी दोन ते तीन दिवस जात होते. तो पर्यंत येथे दंगली घडलेल्या असायच्या. त्यामुळे एक परिपूर्ण उपाय उभा करणे आवश्यक होते. त्यानुसार हे केंद्र सुरू करण्यासाठी पावले उचलल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

पूर्वी आपण आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेची स्थापन केली. त्यावेळी हा विभाग अडगळीतला असल्याचे म्हटले जात होते. पण आता हाच विभाग सर्वात महत्त्वाचा विभाग ठरत आहे. आता सायबर गुन्हे शोध कक्ष हे महत्त्वाचे कक्ष ठरत आहे. महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पासाठी २०१८ मध्ये प्रयत्न सुरू केले होते. परंतु २०१९ मध्ये आमचे सरकार गेले आणि हा प्रकल्प कपाटबंद झाला. पुन्हा आम्ही सरकारमध्ये आलो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वात सरकारमध्ये पुन्हा गृहमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे या



प्रकल्पाला पुन्हा पुढे नेण्याचे काम सुरू झाले असेही फडणवीस म्हणाले. दरवर्षी नव-नवे तंत्रज्ञान येत असते. त्यामुळे तंत्रज्ञान हाताळणारे या क्षेत्रातील तज्ज्ञ तितकेच गतीमान असायला हवे. त्यामुळे या केंद्रात दरवर्षी पाच हजार जणांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. हा प्रकल्प केवळ प्रकल्प राहता कामा नये. इतर राज्यानांही या माध्यमातून सायबर सुरक्षा बाबतचे मार्गदर्शन केले जावे असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. १४४०७ हा मदत क्रमांक देखील सुरू करण्यात आला असून १५ ऑक्टोबरपासून या केंद्रातील सर्व कामे पूर्ण सुरू होतील असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.१५ मिनीटांत पोलिसांनी त्या व्यक्तीचा शोध घेतला चार दिवसांपूर्वी एका वरिष्ठ नेत्याने मला संपर्क साधला होता. त्यांनी मला सांगितले की, 'मला 'सीबीआय'मधून संपर्क साधला जात आहे. माझे पाकिस्तानसोबत संबंध असल्याचे ते म्हणत होते. तसेच त्यांनी कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.' मी त्यांना सांगितले ही फसवणूक आहे. तसेच, त्यांना मुंबई पोलिसांकडे तक्रार देण्यास सांगितली. मी देखील मुंबई पोलिसांना याबाबत सांगितल्यानंतर १५ मिनीटांत पोलिसांनी त्या व्यक्तीचा शोध घेतला. वरिष्ठ नेत्यांना देखील अशा गोष्टींवर विश्वास बसू शकतो.

# एपीएमसी प्रवेशद्वारावर फास्टॅग प्रणाली

**■ नवी मुंबई : धनश्री सट्टा**

वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. मात्र काही गाड्या बाजार आवारात अशाच उभ्या असतात. त्यामुळे नवीन येणाऱ्या वाहनांची अडचण होते. यावर तोडगा काढण्यासाठी एपीएमसी प्रशासनाने प्रत्येक बाजारातील प्रवेशद्वारावर फास्टॅग प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. एपीएमसी प्रशासकीय इमारतीत नुकतीच आमदार शशिकांत शिंदे व सचिव पी. एल. खंडागळे यांच्या उपस्थित बाजार समितीमधील अडीअडचणी सोडवण्यासाठी तसेच बाजाराच्या उत्पन्न वाढीसाठी पाचही बाजार आणि मुख्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अडीअडचणी सांगितल्या. यामध्ये बाजार समितीच्या आस्थापनावर कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांचा विरोध, नवीन भरती करण्याऐवजी शासनाकडून बाजार समिती मध्ये अधिकाऱ्यांना सेवेवर आणा जेणेकरून बाजार



समितीचे कामकाज सुरळीत होईल तसेच बाजारात होणारी वाहतूक कोंडी यावर चर्चा करण्यात आली. या बैठकीत बाजारात फास्टॅग प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. टोलनाक्यांप्रमाणेच पाचही बाजारांच्या प्रवेशद्वारावर बॅरिकेड्स आणि फास्टॅग प्रणाली लावण्यात येणार आहे. या यंत्रणेमुळे बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ होऊन वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. यावर आमदार शशिकांत शिंदे व सचिवांनी लवकरात लवकर ही यंत्रणा सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. प्रत्येक बाजाराच्या प्रवेशद्वारावर ही फास्ट टॅग प्रणाली येत्या काही दिवसात कार्यवनित करण्यात येणार आहे.

यामुळे बाजारात विनाकारण उभ्या असलेल्या गाड्यांवर नियंत्रण मिळवता येईल आणि शेतमाल खाली करून देखील बाजारात उभे असलेल्या गाड्यांना दंड आकारता येईल, त्यामुळे वाहतूक कोंडीची ही समस्या मार्गी लागेल. त्याचबरोबर एपीएमसीच्या उत्पन्नवाढीत देखील भर पडेल.

# बांधकाम नियमावलीचे कागदी घोडे

**■ नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरातील बेलापूर ते ऐरोली या महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू असून या बांधकामांच्या ठिकाणी होणाऱ्या ध्वनी, वायू प्रदूषण तसेच ब्लास्टिंगबाबत वाढत्या तक्रारींमुळे नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचे योग्य ते निराकरण होण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने समिती गठीत केली होती. या समितीमार्फत पालिकेने सव्वा महिन्यापूर्वी २६ ऑगस्टला प्रमाणित



संचालन नियमावली अर्थात एसओपी जाहीर केली होती. परंतू पालिकेने ही नियमावली केल्यावर ही समिती फक्त कागदावरच असून बांधकाम व्यावसायिक मात्र एसोपीमध्ये दिलेल्या अटींचे उल्लंघन करत असल्याचे पाहायला मिळत आहे. नवी मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त या समितीचे प्रमुख आहेत. नवी मुंबई महापालिकेचे शिरीष आरदवाड यांच्याकडे शहर अभियंता व अतिरिक्त आयुक्तपदाचा कार्यभार असल्याने तेच या समितीचे प्रमुख आहेत. या समितीमार्फत नियमावली निश्चित केली असून प्रमाणित संचालन प्रक्रिया जाहीर प्रसिध्द करण्यात आली आहे. पण ही समिती फक्त नावापुरती उरली की काय असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. नवी मुंबई शहरात पुनर्विकासाचे तसेच नव्याने बांधकाम होऊ घातलेल्या बहुमजली इमारतींची कामे वाशी व सीवूड्स, नेरुळ विभागात मोठ्या प्रमाणात सुरू असून बांधकाम प्रकल्पांच्या आजूबाजूच्या नागरिकांना वेळीअवेळी होत असलेल्या यंत्रांच्या मोठमोठ्या आवाजामुळे ध्वनी, वायू प्रदुषण होते. पालिकेकडे याबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होतात. या तक्रारींच्या निवारणासाठीच ही नियमावली पालिकेने केली. पालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी शहरातील बांधकामाबाबत, नियमावलींबाबत तसेच तक्रार निवारणाबाबत एक समिती निश्चित करुन त्याची एसओपी नियमावली तयार करुन नियमावली जाहीर केली आहे.

# कळंबोली सर्कलची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी ७७० कोटींचे उड्डाणपूल

**■ नवी मुंबई : प्रतिनिधी**

शीव पनवेल महामार्गावरील कळंबोली सर्कलवर दररोज होणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी कळंबोली सर्कलचा विस्तार करण्याची घोषणा दोन वर्षांपूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पनवेल येथे केली होती. यासाठी भाजपचे आ. प्रशांत ठाकूर यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. आता दोन वर्षांनंतर या सर्कलच्या विस्तारीकरणासाठी ७७० कोटी ४९ लाख रुपयांच्या रस्ते, पूल बांधणी प्रकल्पाला केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभागाकडून मंजुरी मिळाली आहे. याबाबतची माहिती भाजपने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

कळंबोली सर्कलवरुन दररोज १ लाख ८५ हजार वाहनांची ये-जा होत असल्याने या जंक्शनचा विस्तार एकावर एक अशा बहुमजली तीन उड्डाणपुल आणि रस्त्याचे विस्तारीकरण या परिसरात करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सिडको मंडळ आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या अधिका-यांनी संयुक्तपणे आंतरराष्ट्रीय दर्जाचा रस्ते डिझाईन कंपनीला सल्लागार म्हणून नेमण्याची सूचना केली होती. पनवेल येथे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या महामार्ग



लोकार्पण सोहळ्यासाठी दोन वर्षांपूर्वी एप्रिल २०२२ मध्ये केंद्रीयमंत्री नितिन गडकरी पनवेल येथे आले होते. यासाठी त्यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बहुमजली उड्डाणपूल आणि रस्त्यांचा विस्तारासाठी १२०० कोटी रुपये खर्च करावा लागणार असल्याचे सांगितले होते. परंतु केंद्रीय विभागाच्या विविध परवानग्या, रस्ते व पुलाचे आराखडा बनविण्याचे काम आणि त्या कामाच्या मंजूरीसाठी तब्बल दोन वर्षांपेक्षा अधिकचा काळ लागला.

भाजपचे पनवेलचे आ. प्रशांत ठाकूर आणि उरणचे अपक्ष आ. महेश बालदी यांनीसुद्धा वेळोवेळी केंद्र सरकारकडे या रस्ता विस्तारीकरणासाठी पाठपुरावा केल्याने या परवानगीचे श्रेय या दोन्ही आमदारांनी घेण्याचा प्रयत्न केला आहे. नुकतेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या विस्तारीकरणाच्या कामासाठी ७७०.४९ कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता दिली. यामध्ये १५.५३ किलोमीटरचा एक महत्वपूर्ण पायाभूत प्रकल्प उभारला जाणार आहे. यामुळे सर्कलवरील वाहतूक कोंडी फुटेल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मार्च महिन्यात मालवाहू विमाने उड्डाण घेणार असल्याने पनवेलच्या वाहतूकीवर अधिक ताण येणार आहे. त्यामुळे केंद्रीयमंत्री गडकरी यांनी कळंबोली सर्कलच्या कामाला मंजुरी दिली आहे.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)
**महाराष्ट्र सागरी मंडळ**
इंडियन मर्केन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१७७७७ फॅक्स क्र. ०२२-२२०१४७४०
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email: ceo.mmb@maharashtra.gov.in / ceommb@gmail.com
सत्यमेव जयते

द्वितीय ई - निविदा सूचना (सन २०२४-२५)

Main Portal : https://mahatenders.gov.in

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व योग्य अनुभव असलेल्या इच्छुक उमेदवार यांच्या करीता खाली नमूद केलेल्या कामांसाठी बी-१ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | को-या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी(महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मनोरी, ता. बोरीवली, जि. मुंबई उपनगर येथील समुद्रकिनाऱ्या समोरील दिपस्तंभ / वाचटॉवरचे मजबुतीकरण करणे | २,१०,०९,७१५/- | १५,००,०००/- | २,३६०/- | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| २ | चेंबूर विधानसभेतील माहुल गावातील मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवाच्या बोटी व होड्या समुद्रात जाण्यायेण्यासाठी विकासकामे करणे | ८३,०२,८१५/- | ८३,५००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ३ | बांद्रा बॅन्डस्टॅंड प्रोमिनोड उत्तर बाजुकडे सौरदिव्यांचे खांब बसविणे ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर | ८०,९८,८३२/- | ८१,०००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ४ | बांद्रा बॅन्डस्टॅंड प्रोमिनोड दक्षिण बाजुकडे सुशोभित सौरदिव्याचे खांब बसविणे ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर | ७८,०९,५८८/- | ७८,५००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ५ | गोराई कोळीवाडा जेट्टी व मनोरी कोळीवाडा येथे सौरदिव्याचे खांब बसविणे, ता. बोरीवली जि. मुंबई उपनगर | ७१,७५,६३०/- | ७२,०००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ६ | कार्टर रोड प्रोमिनाड, बांद्रा, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथे स्टेनलेस स्टिल रेलींग बसविणे, आवार भिंतीची उंची वाढविणे व इतर अनुषांगीक कामे करणे | ६२,९०,६१३/- | ६३,५००/- | १,१८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ७ | मोडवी गल्ली प्रवासी जेट्टी, वर्सोवा, ता. अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथील वाहनतळाला इपॉक्सी पेंट करणे, कुंपण घालणे व वाहनतळाची अतिरिक्त जागा तयार करणे | २१,४७,११०/- | २१,५००/- | ५९०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाउनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४.१०.२०२४* रोजी १२:००* ते दिनांक १३.११.२०२४* रोजी १७:००* पर्यंत उपलब्ध होतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४४६२

सही/-/-
(तुषार पाटोळे)
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.

# मोरबे धरण बफर क्षेत्रात अनधिकृत बांधकाम?

**■ नवी मुंबई : धनश्री सट्टा**

शहरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामांची संख्या असताना शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणाच्या परिसरातही आता अनधिकृत बांधकामांचा शिरकाव झाल्याचे चित्र आहे. याबाबत नवी मुंबई



महापालिकेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना या अनधिकृत बांधकामांबाबत लेखी माहिती कळवली आहे. या अनधिकृत बांधकामांवर कारवाई कधी होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. आ. गणेश नाईक यांनीही याबाबत योग्य ती तपासणी करून कारवाई करण्याची मागणी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. रायगड जिल्ह्यातील चौक गावाजवळ माथेरानच्या पायथ्याशी बांधलेले मोरबे धरण हे नवी मुंबई महापालिकेच्या मालकीचे आहे. स्वातंत्र्यानंतर स्वत:च्या मालकीचे धरण असणारी नवी मुंबई ही एकमेव महापालिका आहे. धरणाच्या पाण्याची कमाल उंची ८८ मीटर असून धरणाची एकूण पाणी साठवण क्षमता ही १९०.८९ दशलक्ष घनमीटर आहे. आता महापालिकेच्या मालकीच्या मोरबे धरणाभोवतीही अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाला सुरवात झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे पालिकेने या धरणाच्या बफर झोनमध्येच असलेल्या बेकायदा बांधकामाबाबत जिल्हाधिकारी रायगड यांना पत्राद्वारे कळवले आहे. बेकायदा बांधकामाबाबत कडक कारवाई करण्याची मागणी आ. गणेश नाईक यांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे. मोरबे धरणाच्या बफर झोनमध्ये कोयना, बोरगाव नंबर १, २ अशी गावे असून पालिकेने या भागातील सर्वेक्षण केले आहे. धरणातील पाणीसाठ्याचा फुगवटा ज्या गावांच्या परिसरात जातो, त्या ठिकाणी अनधिकृत बंगल्याचे काम तसेच भराव केला असल्याचे चित्र आहे. मोरबे परिसरातील चुकीच्या कामाची माहिती घेऊन पालिकेने ठोस कारवाई करावी. तेथील पाण्यात कोणतेही सांडपाणी किंवा इतर पाणी जाऊ नये याबाबत महापालिका आयुक्तांनी सतर्क राहून ठोस कारवाई करावी.

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक ११.१०.२०२४ ते १८.१०.२०२४ पर्यंत देण्यात येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक २१.१०.२०२४ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चर्चगेट मुंबई येथील आसावरी इमारत येथे पार्कीग शेटची दुरूस्ती करणे. | ८,३८,८०३/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | कोर्ट मुंबई येथील जुन्या व नविन न्यायालयाच्या इमारतींच्या उताराची दुरूस्ती करणे. | १,६८,७७४/- | १,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ३३६/- |
| ३ | जी. जे. भोसले मार्ग मुंबई येथील निलांबरी इमारत येथे दरवाजा, सिनीटरी फिटींगची दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ८,२९,६५८/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | कफ परेड मुंबई येथील ३ मजल्यावरील ई विंग मेकर टॉवर कोटमधील दरवाजे, खिडक्यांची दुरूस्ती करणे. | ८,४२,८५४/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | विस्तारीत आमदार निवास मुंबई येथील सॅनिटरी फिटींग, फिक्चर, फायरींग डोर इ. दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ८,३७,७९२/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | चर्चगेट मुंबई येथील आसावरी इमारत येथे प्रवेश लॉबीची दुरूस्ती करणे. | ८,३९,६८१/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | नविन सिटी सिव्हील कोर्ट तळमजल्यावरील उत्तर बाजूस एनडीपीएस नविन पुरूष प्रसाधनगृहाची दुरूस्ती करणे. | १,६८,७४३/- | १,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ३३६/- |
| ८ | जी. जे. भोसले मार्ग मुंबई येथील सचिवालय जिमखाना इमारत येथे प्लंबिंग, हार्डवेअर विविध मटेरीअलचा पुरवठा करणे. | ७,९७,००६/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | जी.जे.भोसले मार्ग मुंबई येथील सुनिती इमारत सदनिका-३ मध्ये प्रसाधनगृह व इतर दुरूस्तीची कामे करणे. | ८,३८,८१६/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | चर्चगेट मुंबई येथील आसावरी इमारतर रूम नं. २०२ मध्ये दुरूस्ती व नुतनीकरणे करणे. | ८,४२,२२१/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | विस्तारीत आमदार निवास मुंबई येथील पार्टीशन, फ्लश डोर, आमदार रूमच्या खिडक्या दुरूस्ती करणे. | ८,३९,५११/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १२ | चर्चगेट मुंबई येथील यशोधन इमारती येथे पार्कीग व पॅसेज मध्ये प्लास्टर, रंगकाम व दुरूस्ती करणे. | ८,४२,८२०/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १३ | विस्तारीत आमदार निवास मुंबई येथील फ्लश डोर, स्लाईडींग खिडक्या, लॅमिनेट पार्टीशन चे काम करणे. | ८,३८,५७५/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १४ | नविन सिटी सिव्हील कोर्ट तळमजल्यावरील दक्षिण बाजूस एनडीपीएस नविन पुरूष प्रसाधनगृहाची दुरूस्ती करणे. | २,१७,०००/- | २,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ३३६/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/ ५८८०७
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- १०/१०/२०२४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४४३४


(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

# जयंत पाटलांच्या इस्लामपूरमध्ये जितेंद्र पाटलांसह दोघे इच्छुक

■ **सांगली : यश सावंत**

कोणत्याही शक्तिप्रदर्शनाविना शुक्रवारी सांगलीत विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती पार पडल्या. सांगली, मिरजसह राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांच्या इस्लामपूर मतदारसंघातही तालुकाध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्यासह दोघांनी निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली. तर मिरजेत काल आलेल्यांना जर पक्षाने उमेदवारी देऊन निष्ठावंतावर अन्याय केल्यास बंडखोरीचा इशारा दिला. सोलापूरच्या खासदार शिंदे यांनी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. या वेळी इच्छुकांना पक्षासाठी तुमचे योगदान काय, पक्षाने तुम्हाला वगळून जर उमेदवार अन्य कोणाला दिल्यास तुमची भूमिका पक्षनिष्ठ म्हणून काय असेल असे मोजकेच प्रश्न विचारले. यावेळी त्यांच्यासमवेत खासदार विशाल पाटील उपस्थित होते. तत्पुर्वी कॉंग्रेसचे नेते आमदार डॉ. विश्वजित कदम, जिल्हाध्यक्ष आमदार विक्रम सावंत, शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी खासदार शिंदे यांचे स्वागत केले. सांगली मतदारसंघातून जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा जयश्री पाटील व शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी आपणालाच उमेदवारी मिळावी, अशी मागणी केली. तथापि, मिरज राखीव मतदारसंघातून नऊ जणांनी पक्षाकडे उमेदवारीची मागणी केली आहे. भाजपमधून नुकतेच आलेले प्रा. मोहन वनखंडे, उद्योगपती सी. आर.



सांगलीकर, नंदा कोलप, रवींद्र कोलप, धनराज सातपुते, अरूण थोत्रे, संजय कांबळे आदींनी उमेदवारीची मागणी केली असून निरीक्षकासमोर आपलाच उमेदवारीवर हक्क असल्याचे सांगितले. तथापि, प्रा. वनखंडे यांनी पक्षासाठी काहीही योगदान दिलेले नाही. यामुळे त्यांना जर पक्षाने उमेदवारी दिली तर मान्य केली जाणार नाही, प्रसंगी बंडखोरी करू, असा इशारा सांगलीकर यांनी दिला. या निर्णयाला अन्य आठ इच्छुकांचे अनुमोदन असल्याचेही सांगलीकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. दरम्यान, कॉंग्रेसचे वाळवा तालुकाध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र पाटील यांनीही आपण मुलाखत दिली असून, पक्षाने संधी दिली तर निवडणूक लढविण्याची आपली तयारी असल्याचे सांगितले.

# सुशीलकुमारांचे नातेवाईकही शरद पवार गटाकडे इच्छुक

■ **सोलापूर : प्रथमेश चव्हाण**

आगामी विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाकडे इच्छुकांची भाऊगर्दी झाली आहे. यात महायुतीच्या नेत्यांच्या मुलांसह कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचे निकटचे नातेवाईक आणि विश्वासू अनुयायांनीही उमेदवारीसाठी



मुलाखत दिली आहे. कॉंग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे यांचे निकटचे नातेवाईक, ज्येष्ठ लेखक तथा केंद्रीय अबकारी शुल्क विभागाचे सेवानिवृत्त उपायुक्त नारायण महादेव तथा ना. म. शिंदे यांनी मोहोळ राखीव मतदारसंघातून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडे उमेदवारी मागितली आहे. त्यांचे वडील महादेव शिंदे हे स्वातंत्र्यसैनिक होते. तसेच २५ वर्षे सोलापूर नगरपालिका आणि नंतर महानगरपालिकेत नगरसेवक होते. याशिवाय सुशीलनिष्ठ माजी महापौर प्रा. सुशीला आबुटे यांनीही मोहोळ मतदारसंघातून राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळण्यासाठी मुलाखत दिली आहे. मोहोळ राखीव विधानसभा मतदारसंघ महायुतीअंतर्गत राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे असून, सध्या यशवंत माने हे या पक्षाकडून विधानसभेवर प्रतिनिधित्व करीत आहेत.

# आरोग्य सेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी राज्यात उत्कृष्टता केंद्रे स्थापन करणार

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेदिक, तसेच होमिओपॅथी महाविद्यालयांमधील वैद्यकीय शिक्षण, संशोधन व रुग्णोपचाराचा दर्जा सुधारून त्यांचे जागतिक दर्जाच्या संस्थांमध्ये रुपांतरित करण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमधील आरोग्य सेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उत्कृष्टता केंद्रे (सेंटर्स ऑफ एक्सलन्स) स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने




घेतला आहे. राज्य सरकारने त्यासाठी येणाऱ्या ७ हजार ७५ लाख रुपये खर्चास मंजुरी दिली. राज्यातील सर्व नागरिकांना दर्जेदार व किफायतशीर दरात आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी राज्यातील आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा करण्यावर राज्य शासनाने कायम भर दिला आहे. यासाठी वैद्यकीय शिक्षण व वैद्यकीय महाविद्यालयातील आरोग्य सुविधा सुधारणे, तसेच राज्यात नवीन वैद्यकीय महाविद्यालयांचे बांधकाम, महाविद्यालये सुरू करणे व संलग्नित रुग्णालयांच्या श्रेणीवर्धनासाठी आशियाई विकास बँकेमार्फत निधी उपलब्ध करून घेण्यात येत आहे. हा निधी उपलब्ध करून घेण्यासाठी विविध धोरणात्मक बाबींवर निर्णय घेणे आवश्यक आहे. यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत उत्कृष्टता केंद्र सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्य सरकार उत्कृष्टता केंद्र सुरू करण्यासाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करणार आहे.

राज्यातील उत्कृष्टता केंद्रांची निर्मिती मुख्य केंद्र आणि त्याच्या शाखा या धर्तीवर करण्यात येणार आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अखत्यारितील महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था ही मुख्य उत्कृष्टता केंद्र म्हणून कार्य करेल. तसेच संशोधनाच्या विविध विषयांसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्तरावर इतर उत्कृष्टता केंद्रे शाखा म्हणून कार्यरत राहतील. मुख्य उत्कृष्टता केंद्रामधील संशोधन व चिकित्सालयीन कामकाजासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था यांच्याशी संलग्नित रुग्णालयाचे सहकार्य घेण्यात येणार आहे.

# अन्यथा सर्व बांधकामांच्या परवानग्या रोखू, अग्निसुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीवरून न्यायालयाचा इशारा

■ **मुंबई : गणेश बागडे**

अग्निसुरक्षाविषयक नियमांच्या अंमलबजावणीसाठी त्यांचा एकात्म विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावलीमध्ये (डीसीपीआर) समावेश करणारी अंतिम अधिसूचना काढण्याबाबत काही ना काही सबबी पुढे करून चालढकल करणाऱ्या राज्य सरकारच्या नगरविकास विभागाला उच्च न्यायालयाने बुधवारी फैलावर घेतले. आचारसंहितेची सबब पुढे न करता तातडीने याबाबतची अधिसूचना काढण्यासाठी पावले उचलली नाहीत, तर मुंबईतील महापालिका, अन्य प्राधिकरणांकडून करण्यात येणाऱ्या बांधकाम आराखड्याच्या सर्व परवानग्या रोखण्याचा इशारा दिला.



न्यायालयाने या प्रकरणी नियमितपणे आदेश दिले नसते तर सरकारने या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिलेच नसते. आम्ही तुम्हाला प्रत्येक इमारतीमध्ये अग्निशामक यंत्रे देण्यास सांगत नाही, तर अग्निसुरक्षाविषयक नियमांच्या अंमलबजावणीसाठी त्यांचा एकात्म विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावलीमध्ये समावेश करणारी अंतिम अधिसूचना काढण्यास सांगत आहोत. या आदेशाचीही सरकारकडून अंमलबजावणी केली जात नाही, असेही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने सरकारला सुनावले. तसेच, लवकरात लवकर कधीपर्यंत ही अंतिम सूचना काढण्यात येईल याची माहिती पुढील सुनावणीच्या वेळी द्यावी. मात्र, तेव्हाही सरकारकडून सबबी देणे सुरूच राहिल्यास मुंबईतील महापालिका, अन्य प्राधिकरणांकडून करण्यात येणाऱ्या बांधकाम आराखड्याच्या सर्व परवानग्या रोखण्याचे न्यायालयाने सरकारला बजावले. चेंबूर परिसरात रविवारी सकाळी एकमजली घराला आग लागून त्यात सात जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेबाबत याचिकाकर्त्या आभा सिंग यांच्यातर्फे वकील आदित्य प्रताप यांनी न्यायालयाला सांगितले. त्याची दखल घेऊन न्यायालयाने उपरोक्त आदेश दिले. तत्पूर्वी, अग्निसुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीचा राज्य सरकारने तयार केलेला नवा मसुदा हा २००९ च्या मसुद्याच्या तुलनेत कमकुवत असल्याचेही याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले.

# बेकायदा राजकीय फलकबाजीला आळा, आचारसंहितेपूर्वी विशेष मोहीम राबवण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

विधानसभा निवडणुकांच्या काळात राज्यात बेकायदा फलकबाजीला उधाण येण्याची शक्यता असून त्याची उच्च न्यायालयाने बुधवारी गंभीर दखल घेतली. बेकायदा फलक हटवण्यासाठी १० दिवसांची विशेष मोहीम हाती घेण्याचे तसेच फलक लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश राज्यातील सर्व महापालिका व नगर परिषदांना न्यायालयाने दिले. विशेष म्हणजे लेखी हमी दिल्यानंतरही राजकीय पक्षांनी बेकायदा फलकबाजी केल्यास कठोर कारवाईचा इशाराही न्यायालयाने दिला आहे. सुस्वराज्य फाऊंडेशन या संस्थेने केलेल्या मूळ याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर बुधवारी सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने विशेष



मोहीम यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि इतर महसूल अधिकाऱ्यांनी स्वारस्य दाखवावे आणि सहकार्य करावे, असे आदेश दिले.

# राज्यातील ३१४ गृहनिर्माण प्रकल्प नादारी दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

**राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाच्या संकेतस्थळावरील उपलब्ध माहितीनुसार राज्यातील रेरा नोंदणीकृत तब्बल ३१४ गृहप्रकल्पांविरोधात नादारी आणि दिवाळखोरीची कारवाई सुरू आहे. विविध बँका, वित्तीय संस्था आदींनी राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणामार्फत या ३१४ प्रकल्पांविरोधात नादारी आणि दिवाळखोरीची कारवाई सुरू केली आहे.**

यापैकी सर्वाधिक, २३६ प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशातील आहेत. या सर्व प्रकल्पांची यादी महारेराने आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. हे प्रकल्प केव्हाही दिवाळीखोरीत जाऊ शकतात. त्यामुळे या प्रकल्पांमध्ये घर खरेदी केलेल्यांनी वा घर खरेदी करणाऱ्यांनी ही यादी तपासूनच योग्य तो निर्णय घ्यावा, असे आवाहन यानिमित्ताने महारेराकडून करण्यात आले आहे. ग्राहकांची फसवणूक होऊ नये यासाठी महारेराकडून विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. राष्ट्रीय विधी न्यायाधिकारणाकडून महारेरा नोंदणीकृत प्रकल्पांविरोधात सुरू असलेल्या नादारी आणि दिवाळखोरीच्या कारवाईची याची



तपासणी केली जाते. त्यानुसार यापूर्वीही दिवाळीखोरीची टांगती तलावर असलेल्या प्रकल्पांची यादी महारेराने प्रसिद्ध केली होती. आता पुन्हा महारेराच्या पाहणीत राज्यातील ३१४ गृहप्रकल्प नादारी आणि दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असल्याचे निदर्शास आले आहे. वित्तीय संस्था, बँका, वित्त पुरवठा करणाऱ्या इतर संस्थांनी या प्रकल्पांविरोधात राष्ट्रीय विधी न्यायाधिकरणाकडे धाव घेतली आहे. त्यानुसार या प्रकल्पांविरोधात नादारी आणि दिवाळीखोरीची कारवाई सुरू आहे. कोणत्याही क्षणी हे प्रकल्प दिवाळखोर म्हणून घोषित होऊ शकतात. परिणामी, या प्रकल्पांतील घरे विकत घेणारे ग्राहक अडचणीत येण्याची शक्यता आहे. यापैकी ५६ प्रकल्प निर्माणाधीन असून यापैकी सरासरी ३४ टक्क्यांपेक्षा अधिक सदनिकांची नोंदणी झाली आहे. तर १९४ प्रकल्प व्यापगत (लॅप्स) प्रकल्प असून यातील सरासरी ६१ टक्क्यांपेक्षा अधिक घरांची नोंदणी झाले आहे. उर्वरित ६४ प्रकल्प पूर्ण झोलेले असून यातील ८४ टक्के सदनिकांची नोंदणी झाली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ग्राहकांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता महारेराने या प्रकल्पांची यादी आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे.

# जुहू येथील घर रिकामे करण्याच्या ईडीच्या नोटीस विरोधात शिल्पा शेट्टी, राज कुंद्रा उच्च न्यायालयात

■ **मुंबई : सचिन कदम**

बिटकॉइन फसवणुकीशी संबंधित आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात जुहू येथील बंगला आणि पवना येथील फार्महाऊस रिकामे करण्याबाबत सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) बजावलेल्या नोटिशीला अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा व्यावसायिक पती राज कुंद्रा यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यांच्या याचिकेची दखल घेऊन न्यायालयाने बुधवारी ईडीला नोटीस बजावली व प्रकरणावर गुरुवारी तातडीची सुनावणी ठेवली. शिल्पा आणि राज यांची याचिका न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठासमोर बुधवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी, न्यायालयाने ईडीला नोटीस बजावून याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. ईडीने २७ सप्टेंबर रोजी शिल्पा आणि राज यांना नोटीस बजावून त्यांना जुहू येथील राहते घर आणि पवना येथील फार्महाऊस १० दिवसांच्या आत रिकामे करण्याचे आदेश दिले होते. ही नोटीस ३ ऑक्टोबर रोजी मिळाल्यानंतर त्याविरोधात दाम्पत्याने उच्च न्यायालयात धाव घेतली. ईडीने बजावलेली नोटीस मनमानी आणि बेकायदेशीर असून ती रद्द करावी, अशी मागणी शिल्पा आणि राज यांनी केली आहे. याचिकाकर्त्यांनी त्यांची




जागा तातडीने रिकामी करण्याची आवश्यकता नाही. शिवाय, जुहू येथील घरात याचिकाकर्ते मागील दोन दशकापांसून कुटुंबातील सहा सदस्यांसह राहत आहेत. त्यामुळे, याचिकाकर्त्यांच्या याचिकेकडे मानवतेच्या दृष्टीकोनातूनही पाहिले जावे, अशी विनंती दाम्पत्याच्या वतीने सुनावणीच्या वेळी केली गेली, तसेच, याचिकेवरील अंतिम सुनावणीपर्यंत नोटिशीला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली. ईडीने २०१८ मध्ये अमित भारद्वाज आणि अन्य काही जणांविरुद्ध बिटकॉइन फसवणूक आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपाखाली तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी ईडीने तपासादरम्यान राज कुंद्रा यांना अनेकवेळा चौकशीसाठी बोलावले होते.

# कलिना येथील झोपडपट्टीत अतिरिक्त शौचालये बांधून देण्यास नकार: महापालिकेच्या असंवेदनशील भूमिकेवर उच्च न्यायालयाची नाराजी

■ **मुंबई : सुचिता देशमुख**

शौचालयासारखी मूलभूत सुविधा उपलब्ध करणे हे महानगरपालिकेचे घटनात्मक कर्तव्य आहे. असे असतानाही कलिना येथील झोपडपट्टीत अतिरिक्त शौचालये बांधण्यास नकार देण्याची मुंबई महानगरपालिकेची भूमिका असहकाराची आणि असंवेदनशील असल्याची टीका उच्च न्यायालयाने केली. तसेच, या परिसरात महिला व पुरूषांसाठी १५ दिवसांत तात्पुरते, तर तीन महिन्यांत कायमस्वरूपी अतिरिक्त शौचालय बांधण्याचे आदेश न्यायालयाने महानगरपालिकेला दिले. या आदेशांची अंमलबजावणीची जबाबदारी पूर्णत: महापालिका आयुक्तांची राहील, असेही न्यायालयाने बजावले.

या परिसरात १६०० हून अधिक कुटुंबे वास्तव्यास असून त्या तुलनेत स्वाच्छतागृहांची खूपच कमतरता आहे. या परिसरात सद्यस्थितीला




केवळ दहाच शौचायलये असून त्यात सहा पुरुषांसाठी आणि चार महिलांसाठी आहेत. ही स्थिती अत्यंत दुर्दैवी असून शौचालयाची संख्या ही अपुरी या शब्दाच्या व्याखेलाही लाजवेल, अशी असल्याची टीका देखील न्यायमूर्ती महेश सोनाक आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने केली. महिला आणि पुरूषांसाठी पुरेशी शौचालये उपलब्ध करण्याचे आदेश महानगरपालिकेला द्यावेत या मागणीसाठी कलिना येथील झोपडपट्टीतील काही रहिवाशांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या याचिकेवर निर्णय देताना खंडपीठाने महानगरपालिकेच्या असहकाराची आणि असंवेदनशील भूमिकेवर टीका करून उपरोक्त आदेश दिले. या परिसरात अतिरिक्त शौचालये बांधण्यात येतील. परंतु, झोपडपट्टीचा काही भाग हा महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) मालकीचा असल्याने त्यांच्याकडून अतिरिक्त शौचालयांच्या बांधकामासाठी 'ना हरकत' प्रमाणपत्र (एनओसी) आवश्यक आहे, असे महापालिकेने न्यायालयाला सांगितले होते. त्यानंतर, म्हाडाने 'ना हरकत' प्रमाणपत्र देण्याचे आणि महापालिकेला या प्रकरणी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन न्यायालयाला दिले होते. मात्र, म्हाडाने अद्याप 'ना हरकत' प्रमाणपत्र दिलेच नसल्याने झोपडपट्टीत अतिरिक्त शौचालये बांधता येणार नाहीत, असा दावा महापालिकेने केला होता. त्यावर, महापालिकेचा हा दावा चुकीच्या आणि दिशाभूल करणारा असल्याची टिप्पणी करून न्यायालयाने त्याबाबत नाराजी व्यक्त केली. अतिरिक्त शौचालये बांधण्यास आवश्यक असलेले 'ना हरकत' प्रमाणपत्र म्हाडाने प्रतिज्ञापत्रासह न्यायालयात सादर केले होते.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in
**ई -निविदा सुचना क्र. २८ सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
| --- | --- | --- |
| १ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. ९ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५५३१३/- |
| २ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. १० येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५५४००/- |
| ३ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. ११ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९४३९३४/- |
| ४ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. १२ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५५३९२/- |
| ५ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. १३ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१०५६५००९/- |
| ६ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. १४ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९४३९३५/- |
| ७ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. १५ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५४८९५/- |
| ८ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. १६ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९४८३३०/- |
| ९ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. १७ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९४५९८५/- |
| १० | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. १८ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५४८९५/- |
| ११ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. १९ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५४८९५/- |
| १२ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. २० येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१०५६०८९३/- |
| १३ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. २१ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५४८९५/- |
| १४ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. २२ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५२६३४/- |
| १५ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. २३ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५२६३४/- |
| १६ | मुळगौण कामांतर्गत रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर इमारत. क्र. २४ येथे बाह्य आणि अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.१४९५५३१३/- |
| १७ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड पोलीस स्टेशन, मुलुंड (प.) मुंबई येथे टॉयलेट ब्लॉकचे नूतनीकरण करणे. | रु. २७५८२६३/- |
| १८ | मुलुंड पोलीस स्टेशन, मुलुंड (प) मुंबई येथे टेरेस वॉटर प्रुफिंग आणि ओव्हरहेड पाण्याची टाकी. | रु. १७७४४४४/- |
| १९ | मुळगौण कामांतर्गत कांदीवली पोलिस स्टेशन, कांदीवली (प), मुंबई अंतर्गत दवाखान्याचे नुतनीकरण करणे. | रु. १९५६५१५/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यांत येईल.
ई- निविदा उपलब्ध कालावधी- दि.११/१०/२०२४ ते दि.१८/१०/२०२४ पर्यंत
ई - निविदा उघडणे - दि. २१/१०/२०२४ दुपारी १५.०० वाजता.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ९६५२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८. दिनांक :-
08 OCT 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४४३६

# फॉरेक्स मार्केट ट्रेडींगच्या नावाखाली शेकडो गुंतवणूकदारांची फसवणूक, गुन्हे शाखेची कॉल सेंटरवर कारवाई, १४ जणांना अटक

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

फॉरेक्स मार्केट ट्रेडींगच्या नावाखाली देशभरातील शेकडो गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या बनावट कॉल सेंटरवर गुन्हे शाखेच्या कक्ष-८ने कारवाई केली. या कारवाईत १४ जणांना अटक करण्यात आली असून आरोपींनी देशभरात शेकडो गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. मालाड, चिंचोली बंदर येथील 'क्वॉटम टॉवर'च्या पहिल्या मजल्यावर 'कॉन्टिक इन्फोटेक कंपनी' नावाने बनावट कॉल सेंटर सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या कक्ष ८ चे पोलीस उपनिरीक्षक विकास मोरे यांना मिळाली होती. त्यानुसार प्रभारी पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने पडताळणी केली. या कॉलसेंटरमध्ये ऑनलाईन मॅच ट्रेडर अॅप्लीकेशनद्वारे लोकांची वैयक्तिक माहिती मिळविण्यात येत होती. त्यानंतर त्यांना




ऑनलाईन अप्लीकेशनद्वारे फोन करून, इंग्लडमधून व्हीएफएक्स मार्केट या ब्रोकींग कंपनीतून बोलत असल्याचे भासवण्यात येत होते. फॉरेक्स मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास खात्रीशीर व जास्तीत जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांना व्यवहार करण्यास भाग पाडण्यात येत होते. गुंतवणूकदारांकडून लाखो रूपये बेकायदेशीरपणे हस्तांतरित करून घेण्यात येत होते. तसेच व्यवहाराला सुरुवात करताच आरोपी स्वतःच गुंतवणूकदारास प्रथम फायदा झाल्याचे भासवत होते. त्यानंतर पुन्हा गुंतवणूकदाराकडून आणखी पैसे उकाळून त्यांचे ट्रेडिंग अॅपमध्ये नुकसान झाल्याचे भासवून गुंतवणूकदारांचे लाखो रूपये लुबाडत होते, अशी माहिती पोलिसांना मिळाली. या पडताळणीनंतर कक्ष ८ मधील अधिकारी /अंमलदार यांची पथके तयार करून त्या ठिकाणी छापा घालण्यात आला. या कॉल सेंटरमध्ये एकूण १४ व्यक्ती सापडले. त्यांच्या ताब्यातून एकूण दोन लॅपटॉप, १६ डेस्कटॉप, २ मोबाइल फोन व गुन्ह्याविषयी इतर कागदपत्रे असे एकूण अडीच लाख रुपये किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली. या सर्व आरोपींविरोधात मालाड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३१६ (५), ३१९ (२), ३१८ (४) तसेच भारतीय तार अधिनियम २५ (क) व माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायदा कलम ६६ (क), ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम सह कलम, महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थामधील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ कलम ३ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# जेवताना ताटात हात घातल्याने केला तरुणाचा खून! पुण्यातील धायरीतील घटना; पाचजणांविरुद्ध गुन्हा

**पुणे: विशेष प्रतिनिधी**

पुण्यात गुन्हेगारीने कळस गाठला आहे. किरकोळ कारणावरून एकमेकांची हत्या करण्याच्या घटनांत गेल्या काही दिवसांपासून वाढ झाली आहे. धायरी येथे दारु प्याल्यानंतर एकाने ताटात हात घातल्याने झालेल्या वादातून तरुणाला बेदम मारहाण करून त्याची हत्या करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना शनिवारी रात्री धायरी रस्त्यावरील त्रिमुर्ती किराणा दुकानासमोर मध्यरात्री एकच्या सुमारास ही घटना घडली. आरोपींनी तरुणाला बांबू, दगडाने मारहाण करून त्यांची हत्या केली. या प्रकरणी पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदित्य घोरपडे (वय २१, रा. घोरपडे चाळ, गारमाळ, धायरी)




असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी या प्रकरणी आकाश ऊर्फ नन्या परदेशी, त्याचा सावत्र भाऊ सुरेश शुक्ला तसेच आणखी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला. या प्रकरणी आदित्यची आई राजश्री संतोष घोरपडे यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचे वृत्त असे की, आदित्य घोरपडे व त्याचे मित्र नऱ्हे येथील गॅलक्सी रेस्टो बार येथे दारु प्यायला बसले होते. दारु प्याल्यानंतर त्यांनी जेवण मागविले. दरम्यान, जेवण करतांना आकाशने आदित्यच्या ताटात हात घालून खण्यास सुरुवात केली. यामुळे भडकलेल्या आदित्यने माझ्या ताटातील कशाला खातो असे आकाशला म्हटले.

# ५९ वर्षीय वृद्धाचे १७ वर्षीय तरुणीवर जडले एकतर्फी प्रेम, प्रेमापोटी केले असे काही की...

**नागपूर : विशेष प्रतिनिधी**

वाठोड्यात राहणाऱ्या ५९ वर्षीय वृद्धाचे वस्तीत राहणाऱ्या १७ वर्षीय तरुणीवर जीव जडला. तिच्यावर तो एकतर्फी प्रेम करायला लागला. तिच्याशी वारंवार संपर्क करुन बोलायला लागला. त्याने तरुणीला प्रेमाची मागणी घातली. त्यामुळे गोंधळलेल्या मुलीने त्याच्याशी संपर्क तोडला. मात्र, वृद्धाला तिचा नकार पचला नाही. त्यामुळे त्याने तिचा पाठलाग करणे सुरु केले. तिच्या मित्राच्या दुचाकीवर दिसल्यानंतर दोघांनाही धडक मारुन पळून गेला. या प्रकरणी वाठोडा पोलिसांनी तरुणीच्या तक्रारीवरुन वृद्धाविरुद्ध गुन्हा दाखल करुन अटक केली.

वाठोडा वस्तीत शेषराव कुवर हा पत्नी व एका मुलासह राहतो. तो नळ आणि पाईपलाईन दुरुस्तीचे काम करतो. तो विकृत स्वभावाचा असून त्याचे वस्तीत सहसा कुणाशीच पटत नाही. त्याच्या वस्तीत १७ वर्षीय मुलगी सोनम (बदललेले नाव) राहते. तिचे आई-वडिल कोरोनामध्ये मरण पावले. ती ७० वर्षीय आजीसह राहते. ती बाराव्या वर्गाची विद्यार्थिनी असून तिचे उल्केश नावाच्या युवकाशी मैत्री आहे. तिच्या आईवडिलाच्या निधनानंतर तिने आजीला हातभार लागावा म्हणून शिक्षणासह काम करणे सुरु केले. यादरम्यान, वस्तीत



राहणारा शेषराव हा आजीशी बोलण्याच्या निमित्ताने घरी यायला लागला. त्याने सोनमशी ओळख निर्माण केली आणि तिचा मोबाईल क्रमांक घेऊन बोलायला लागला. तीसुद्धा त्याच्याशी बोलत होती. मात्र, त्याचे घरी येणे वाढले आणि सोनमशी जवळीकताही वाढली. त्याने घरात एकटी असताना सोनमला प्रेमाची मागणी घातली. 'माझे तुझ्यावर प्रेम असून तू माझ्याशी संबंध ठेव. तुला शिक्षणासाठी पैसै पुरवतो' असे आमिष दाखवले. मात्र, शेषरावचा उद्देश लक्षात आल्यामुळे सोनमने त्याच्यापासून दुरावा निर्माण केला. त्याच्याशी बोलणे टाळले. त्याच्या घराकडील रस्त्याने जाणे सोडून दिले.

सोनमने बोलणे सोडल्यामुळे चिडलेल्या शेषरावने 'तुझे उल्केश नावाच्या युवकाशी प्रेमप्रकरण असून दोघांमध्ये शारीरिक संबंध आहेत.' अशी बदनामी करण्याची धमकी दिली. 'वस्तीत राहण्याच्या लायकीची सोडणार नाही,' अशी घरी येऊन धमकी देऊन अश्लील चाळे केले. घाबरलेल्या सोनमने त्याला नाद सोडण्याची विनंती केली. बदनामी न करण्यासाठी विनवणी केली.उल्केश आणि सोनम हे दोघे ५ सप्टेंबरला दुचाकीने फिरायला गेले होते. महालमध्ये काही खरेदी केल्यानंतर दोघेही घराकडे परत येत होते. शेषरावला दोघेही दुचाकीने जाताना दिसले. शेषरावने दोघांचा पाठलाग केला.

# प्रेमसंबंधाला धार्मिक वळण, भाईंदर मध्ये तणाव: तरुणाला मारहाण, दुकानाची तोडफोड

**वसई : विशेष प्रतिनिधी**

भाईंदरमध्ये एका जोडप्याच्या प्रेमसंबंधाला धार्मिक वळण मिळाल्याने तणाव निर्माण झाला होता. या तरुणाने अल्पवयीन तरुणीला फूस लावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करून जमावाने त्याला मारहाण करत त्याच्या दुकानाची तोडफोड केली. या प्रकरणाला धार्मिक वळण लागल्याने मोठा तणाव निर्माण झाला होता. अखेर भाईंदर पोलिसांनी मध्यरात्री २४ वर्षीय तरुणाला अटक केली आहे. भाईंदरच्या केबिन रोड परिसरात २४ वर्षीय तरुणाचं एक दुकान आहे. त्याचे १७ वर्षीय तरुणीशी प्रेमसंबंध होते. तो रात्री तिला भेटायला दुकानात बोलवत असे. दुकानाचे पुढील दार बंद करून तो तिला मागच्या दाराने बोलवत होता. याची कुणकुण मंगळवारी नागरिकांना



लागली. नागरिकांनी या तरूणाला त्याला धरून चोप दिला. तरुण आणि तरुणी भिन्न धर्मीय असल्याने ही गोष्ट वाऱ्यासारखी पसरली आणि धार्मिक संघटनेसह मोठा जमाव जमला. संतप्त झालेल्या जमावाने बाहेरूनच दुकानाची तोडफोड केली. माजी आमदार नरेंद्र मेहता, आमदार गीता जैन हे देखील मध्यरात्री घटनास्थळी पोहोचले.

नवघर पोलिसांनी या तरुणाला ताब्यात घेतले. मात्र पीडित तरुणी तक्रार देण्यास तयार नव्हती. अखेरीस तिचे मन वळिवण्यात आले आणि तिच्या तक्रारीवरून नवघर पोलिसांनी रात्री उशिरा आरोपी तरूणाविरोधात बालकांचे लैंगिक अत्याचार विरोधी कायदा पोस्को) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आम्ही आरोपीला अटक केली असून परिस्थिती नियंत्रणात आहे, अशी माहिती नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी यांनी दिली.

# वडिलांकडून मुलीवर वारंवार बलात्कार, मदतीसाठी भावाकडे गेली पण त्यानेही...

**भोपाळ : विशेष प्रतिनिधी**

मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यात एका अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्कारामुळं संपूर्ण शहर हादरले आहे. १५ वर्षाच्या मुलीवर तिच्याच वडिलांनी व भावाने बलात्कार केला आहे. इतकंच नव्हे तर पीडित मुलीच्या भावाने तिचा अश्लील व्हिडिओदेखील बनवला आहे. तो व्हिडिओ दाखवून त्याने तिला वारंवार धमकावले आहे. पीडीतेने दाखल केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करुन दोन्ही आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडितेची आई त्यांच्या कुटुंबापासून वेगळी राहत होती. ती ओडिशा येथे राहत होती. तीन वर्षापूर्वी तिची आई गेल्यानंतर वडिल मुलीवर वारंवार बलात्कार करत होते. वडिलांच्या या अत्याचाराला कंटाळून तिने तिच्या मोठ्या भावाला आपबीती सांगितली आणि त्याच्याकडे मदत मागितली. मात्र, तिची मदत



करण्याऐवजी त्यानेच तिच्यावर अत्याचार केला. त्याने त्याचा व्हिडिओदेखल बनवला होता. पिडीतेचा मोठा भाऊदेखील वारंवार तिच्यावर बलात्कार करत होता. तसंच, याबाबत कोणाला काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली आहे. वारंवार होणाऱ्या अत्याचाराला वैतागून पीडितेने तिच्या दुसऱ्या भावाला याबाबत सांगितले. त्यानंतर दोघानीही गुरुवारी पोलिसांसोबत संपर्क साधून तक्रार दाखल केली.

# समुपदेशनामुळे मुलीवर झालेला अत्याचार उघडकीस; मावशीच्या पतीविरोधात गुन्हा दाखल

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

मावशीच्या पतीने १५ वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याचा प्रकार घाटकोपर येथे घडला. पीडित मुलीच्या समुपदेशनात हा प्रकार उघड झाला. त्यानंतर समुपदेशन करणाऱ्या ३१ वर्षीय महिलेने याप्रकरणी घाटकोपर पोलिसांकडे तक्रार केली असून पोलिसांनी बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याअंतर्गत (पोक्सो) गुन्हा दाखल केला आहे. १५ वर्षाची



पीडित मुलगी एप्रिल महिन्यात घाटकोपर येथे मावशीच्या घरी आली होती. त्यावेळी मावशीच्या पतीने पीडित मुलीला पॉर्न व्हीडीओ दाखवून तिच्यावर अत्याचार केला. पीडित मुलीचे तक्रारदार महिलेने नुकतेच समुपदेशन केले. त्यावेळी तिने घडलेला प्रकार सांगितला. आरोपी तिचा नातेवाईक असल्यामुळे तिने घाबरून हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. अखेर पीडित मुलीचे समुपदेशन करणाऱ्या ३१ वर्षीय महिलेने याप्रकरणी घाटकोपर पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी शुक्रवारी पीडित मुलीच्या मावशीच्या पतीविरोधात पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, एप्रिल महिन्यात आरोपीने पीडित मुलीवर वारंवार अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी तपास सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

# सामूहिक बलात्कारानंतर पीडितेला घरासमोर फेकून दिलं; धक्कादायक घटनेनं जयपूर हादरलं, चारही नराधम सापडले!

**जयपूर : विशेष प्रतिनिधी**

कामावरून घरी परतल्यानंतर आपली २२ वर्षाची तरुण मुलगी घरी नसल्याचं पाहून तिच्या वडिलांना मोठा धक्का बसला होताष्टत्यांनी बराच शोध घेऊनही मुलीचा थांगपत्ता लागला नाहीष्टत्याच दिवशी मध्यरात्र उलटून गेल्यानंतर एक गाडी त्यांच्या घरासमोर थांबली आणि आतून त्यांच्या मुलीला अक्षरशः गाडीबाहेर फेकून देण्यात आलं.. ती जिवंत होती की नाही याचीही वडिलांना खात्री नव्हती! जयपूरमध्ये घडलेल्या या धक्कादायक घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून पोलिसांनी वेगानं तपासाची चक्रं फिरवून दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत! या सगळ्या प्रकाराबाबत जयपूर पोलिसांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिल्यानंतर नेमकं काय घडलं याचा खुलासा झाला आहे. ही घटना घडली ९ ऑक्टोबरच्या मध्यरात्री. जयपूरच्या जयसिंग पुरा खोर पोलीस स्थानकाच्या हद्दीत पीडित मुलगी व तिचे वडील वास्तव्यास आहेत. बुधवारी संध्याकाळी पीडीत मुलीचे वडील घरी परतल्यानंतर त्यांना मुलीचा कुठेच थांगपत्ता लागला नाही. त्यामुळे




हवालदील झालेल्या वडिलांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला. पण त्यांना मुलगी सापडली नाही. या सगळ्यात मध्यरात्र उलटून गेली. शेवटी काय करायचं या विचारात असतानाच घराबाहेर एक गाडी येऊन थांबली.मध्यरात्री १ च्या सुमारास त्यांच्या घराबाहेर एक एसयूव्ही कार थांबली आणि आतल्या नराधमांनी त्यांच्या मुलीला अक्षरशः बाहेर फेकून दिलं. नंतर गाडी सुसाट वेगात निघून गेली. आपली मुलगी निश्चल पडल्याचं पाहून वडिलांना प्रचंड धक्का बसला. तिचा मृत्यू झालाय की काय? अशी शंकाही त्यांना आली. त्यानंतर त्यांनी लागलीच तिला रुग्णालयात दाखल केलं. जयपूर नॉर्थच्या पोलीस उपायुक्त राशी डोगरा यांनी रविवारी पत्रकार परिषद घेऊन या सगळ्या धक्कादायक प्रकाराबाबत सविस्तर माहिती दिली. 'पीडित तरुणीच्या वडिलांनी १० ऑक्टोबर रोजी आमच्याकडे तक्रार दाखल केली. त्यात त्यांनी म्हटलं आहे की ते रात्री घरी परतले तेव्हा पीडिता घरी नव्हती. नंतर मध्यरात्री आरोपींनी पीडित तरुणीला त्यांच्या घरासमोर फेकून दिलं. तिची परिस्थिती गंभीर होती. तिचे कपडे अस्ताव्यस्त झाले होते. त्यावरून तिच्यावर अतिप्रसंग झाल्याचं स्पष्ट होत होतं. तिला लागलीच रुग्णालयात दाखल करण्यात आलं. आम्ही चार आरोपींविरोधात या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्यातल्या दोघांना आम्ही २४ तासांच्या आत अटक केली तर रविवारी आम्ही इतर दोघांच्याही मुसक्या आवळल्या', अशी माहिती राशी डोगरा यांनी दिली.

## बेवारस मृतदेह

वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र.४८/२०२४ कलम- १७४ फौ.दं.प्र.संहिता १९७३ अन्वये अनोळखी बेवारस मयत इसम वय अंदाजे- ५५ वर्षे, बांधा- सडपातळ, केस-दाढी काळी पांढरी असलेला इसम वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून नमूद




इसमाचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे. तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क-**
**श्री.अजिनाथ फुंदे,**
**पोलीस उपनिरीक्षक**
**वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र :**
**९६८९८५८०४८**
**पोलीस ठाणे क्रमांक :**
**०२२२६४२३१२२**

## बेवारस मृतदेह

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र.६७/२०२४ कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता(बीएनएसएस) २०२३ अन्वये अनोळखी बेवारस इसम वय अंदाजे- ५० ते ५२ वर्षे, बांधा- मध्यम, रंग-गोरा, उंची- अंदाजे ५ '१९' इंच, केस- काळे पांढरे, डोळे- घारे, असलेला इसम अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये बेशुद्धावस्थेत मिळून आला असून उपचाराकामी जीवन विकास हॉस्पिटल,



विलेपार्ले पूर्व येथे दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचारादरम्यान मयत घोषीत केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क-**
**श्री.शंकर लक्ष्मण खाडे, पोलीस उपनिरीक्षक**
**अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ८६००८७०३२१**
**पोलीस ठाणे क्रमांक :**
**०२२२६८३१५६२**

# दुचाकी लावण्यावरून वाद; दोन जणांना बोलावून केले भयानक कृत्य, मुलाचा मृत्यू, चार जखमी

**चंद्रपूर: विशेष प्रतिनिधी**

शेजारी राहणाऱ्या दोन कुटुंबांमध्ये क्षुल्लक कारणावरून वाद झाला. याच वादातून दोन गावगुंडांना बोलावून कुटुंबाला मारहाण केली. तसेच चाकूने वार करत एका सतरा वर्षीय मुलाचा खून करण्यात आला. तर घटनेतील मृत मुलाचे चार आप्त चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झाले आहेत. सदरची घटना चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे घडली. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल



या गावात वास्तव्यास असलेल्या कामडी परिवारावर हा हल्ला चढविण्यात आला आहे. या घटनेत प्रेम कामडी या मुलाचा मृत्यू झाला आहे. कामडी परिवार व त्यांच्या शेजारी राहणाऱ्या कुटुंबात रस्त्यात दुचाकी लावण्यावरून वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला कि थेट काटा काढण्याचे परिवाराने ठरविले. यावरून एका कुटुंबाने चंद्रपूरवरून दोन गुंड बोलावले. या गुंडांनी रात्री गावात येऊन कामडी कुटुंबावर हल्ला केला. चाकू घेवून असलेले हे दोन गुंड चाकूने सपासप वार करीत होते. चाकूने वर करत असताना सतरा वर्षांचा प्रेम कामडी या मुलाचा मृत्यू झाला. तर कामडी कुटुंबातील इतर चार जण जखमी झाले. जखमींना लागलीच उपचारासाठी चंद्रपूरला हलवण्यात आले. घटनेची माहिती मिळताच मूल पोलीसांनी घटनास्थळी दाखल होत सहा आरोपींना ताब्यात घेतले. दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ आज मूल बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in
**ई -निविदा सुचना क्र. ३२ सन २०२३-२०२४**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.


| अ.क्र | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.) मुंबई येथील मुलुंड पोलीस स्टेशनची बाह्य दुरुस्ती करणे - समोरची बाजू आणि मागील बाजू | रु. ७२४६०२७/- |
| २ | मुळगौण कामांतर्गत मुख्य इमारत येथे सेंटोस बाजूचे तहसीलदार कार्यालय आणि मुलुंड (प.) मुंबई येथे न्यायालयीन इमारतीत संरचना मजबूत करणे आणि बाह्य प्लास्टर प्रदान करणे | रु. २३६७७९०/- |
| ३ | मुळगौण कामांतर्गत तहसीलदार कार्यालय, मुंबई (प.) येथे पाण्याच्या टाकीच्या वर उत्तर आणि दक्षिण बाजूच्या टेरेसवर प्रीकोटेड शीट प्रदान करणे आणि निश्चित करणे. | रु. ३००७९६७/- |
| ४ | मुळगौण कामाअंतर्गत चारकोप पोलीस स्टेशन, चारकोप, मुंबई येथील संरक्षक भिंतीची दुरुस्ती करणे. | रु.१६७९७०२/- |
| ५ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.) मुंबई येथील संजय गांधी बाजूच्या तहसीलदार कार्यालयात स्ट्रक्चरल मजबुतीकरण आणि बाह्य प्लास्टर प्रदान करणे. | रु. १७१२७४५/- |
| ६ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.) मुंबई येथील एन.टी. येथील नायब तहसीलदार आणि निवासी नायब तहसीलदार यांची दुरुस्ती व नूतनीकरण करणे. | रु. २४८८५५३/- |
| ७ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.) मुंबई येथील मुलुंड (प.) मुंबई येथील तहसीलदार बिल्डिंग येथे न्यायालयाच्या बाजूने स्ट्रक्चरल मजबुतीकरण आणि बाह्य प्लास्टर पेंटिंग प्रदान करणे. | रु. २४३८७१०/- |
| ८ | मुळगौण कामांतर्गत मुलुंड (प.) मुंबई येथे तहसीलदार कार्यालय आणि न्यायालयाची इमारत मध्ये एम.सी.सी. येथे स्ट्रक्चरल मजबुती आणि बाह्य प्लास्टर पेंटिंग प्रदान करणे. | रु. २४९२९४७/- |
| ९ | मुळगौण कामांतर्गत मानखुर्द, चिल्ड्रेन एड सोसायटी, बॅरेक क्र. १०/६५ येथील छप्परांचे नुतनीकरण करणे . | रु.१८११७४१/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यांत येईल.
ई- निविदा उपलब्ध कालावधी- दि.१२/१०/२०२४ ते दि. २१/१०/२०२४ पर्यंत
ई - निविदा उघडणे - दि. २२/१०/२०२४ दुपारी १५.०० वाजता.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ८६८८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८. दिनांक :- 10 OCT 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४४५७



# बिष्णोई टोळी महाराष्ट्रात कशी पसरते आहे? महाराष्ट्रात पसरण्यासाठी बिष्णोई टोळीला समाजमाध्यमांचा आधार

■ मुंबई : गणेश बागडे

माजी मंत्री झियाउद्दिन अब्दुल रहीम सिद्दीकी उर्फ बाबा सिद्दीकी यांच्या हत्येतही लॉरेन्स बिष्णोई टोळीचा सहभागाच्या चर्चेमुळे पंजाब, राजस्थान आणि हरियाणामध्ये सक्रीय असलेल्या लॉरेन्स बिश्नोई टोळी महाराष्ट्रातही हातपास पसरण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. अमेरिका, कॅनडा येथून या टोळीचा कारभार चालवणाऱ्या अनमोल बिष्णोईने यापूर्वी अभिनेता सलमान खान याच्या घरावरही गोळीबार करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. समाज माध्यमांचा वापर करून ही टोळी राज्यात हातपाय पसरत आहे. मालाड पूर्व येथील केटरिंगचा व्यवसाय करणाऱ्या ५३ वर्षीय व्यक्तीला बिष्णोई टोळीच्या नावाने धमकी देण्यात आली आहे. बिष्णोई टोळीचे हस्तक तुरुंगात आहेत .त्यांना सोडवण्यासाठी २० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली आहे. गेल्यावर्षी २० जुलैला एका व्यावसायिकाला १८५५ या क्रमांकापासून सुरू होणाऱ्या क्रमांकावरून हा दूरध्वनी आल्यामुळे तो परदेशातून करण्यात आल्याचे भासवण्यात आले आहे. या धमकीमागे खरंच बिष्णोई टोळीचा सहभाग आहे का, याबाबत दिंडोशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रसिद्ध गायक सिद्धु मुसेवाला हत्येत लॉरेन्स बिश्नोईचा सहभाग होता. या प्रकरणानंतर ही टोळी चांगलीच चर्चेत आली होती. या हत्येत राज्यातील संतोष जाधव आणि सौरभ महाकाळ यांचीही नावे चर्चेत आली होती. त्यावेळी ही टोळी राज्यातही त्यांचे जाळे पसरवत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. जाणकारांच्या माहितीनुसार, ही टोळी समाज माध्यमांचा वापर प्रचारासाठी करत असून त्याच्या माध्यमांतून तरूणांना लॉरेन्स बिष्णोई नावाबाबत असलेली उत्सुकता हेरून टोळी राज्यात हातपाय पसरत आहे.

लॉरेन्स बिष्णोईचा जन्म पंजाबमधील उच्चभ्रू कुटुंबात झाला आहे. अबोहर इथल्या कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शिक्षण घेतले. त्याचे आई-वडील लविंदर आणि सुनिता सुरूवातीपासूनच श्रीमंत होते. त्यांची वडिलोपार्जीत शेकडो एकर जमीन आहे. तसेच लॉरेन्सचे कुटुंबिय चांगल्या पदावर कार्यरत आहेत. लविंदर हे पोलीस हवादार पदावर कार्यरत होते.त्याच्या वडिलांना त्याला पोलीस अधिकारी बनवायचे होते. पण लॉरेन्सने वेगळा मार्ग निवडला. महाविद्यालयात असतानाच विद्यार्थी संघटना स्थापन केली होती. त्या माध्यमातून पुढे त्याने टोळी उभी केली. चंदीगडमध्ये शिक्षणासाठी गेल्यावर लॉरेन्सने गुन्हेगारी क्षेत्रात प्रवेश केला. त्याच्यावर अनेक गुन्हे नोंद आहेत.

लॉरेन्स विरोधात पंजाब, दिल्ली, राजस्थान इथे त्याच्याविरोधात गुन्हे नोंद केले गेलेत. भरतपूर कारागृहानंतर त्याला दिल्लीच्या तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले होते. सद्या तो अहमदाबादच्या साबरमती मध्यवर्ती कारागृहात आहे. त्यांच्या अटकेनंतरही त्याचे हस्तक अनमोल बिष्णोई, गोल्डी ब्रार, रोहित गोदारा यांनी परदेशातून टोळीच्या कारवाया सुरू ठेवल्या आहेत.

## संघाची भाजपला विचारणा, 'निवडणुकीत काय मदत पाहिजे...'

■ वर्धा: सम्यक कासारे

तुमची गरज राहली नाही, अशी भाषा करणाऱ्या भाजपला आता संघाची आठवण झाली आहे. अर्थात लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात झटका बसला, हे त्यामागचे प्रमुख कारण असल्याचे दिसून आले आहे. संघाची मदत आवश्यक अशी उपरती झालेल्या भाजपला मग मातृसंस्था म्हटल्या जाणाऱ्या संघानेही माफ केल्याची ही ताजी घडामोड म्हणावी लागेल.

दोन दिवसांपूर्वी संघाची पश्चिम विदर्भ शाखा व भाजप नेते यांची गोपनीय बैठक संपन्न झाली. संघ संघटनेत वर्धा हा अमरावती जिल्ह्याशी जोडला असून त्याच रचनेत अचलपूर हा वेगळा जिल्हा मानल्या जातो. या बैठकीत संघाचे पश्चिम विदर्भ प्रमुख श्रीधर घाटे तसेच सहकारी उपस्थित होते. यात वर्धा जिल्ह्यातून दोन आमदार, जिल्हाध्यक्ष सुनील



गफाट, जिल्हा भाजपचे तीन वरिष्ठ पदाधिकारी सहभागी झाले होते. लोकसभा निवडणुकीत संघाशी समन्वय न राखल्याने नामुष्की झाल्याचे भाजपने खुल्या दिलाने मान्य केले. मात्र, आगामी विधानसभा निवडणुकीत असे होता कामा नये. म्हणून सहकार्य करण्याची विनंती भाजपकडून झाली. तेव्हा संघ पदाधिकाऱ्यांनी कशी मदत हवी अशी विचारणा केली. त्यावर निवडणूक प्रचारात आमच्या त्रुटी, कमतरता, उणिवा आम्हास लक्षात येत नाहीत. त्या समजल्या तर दूर करून प्रचार यंत्रणा सक्षम करता येईल. त्या त्रुटी शोधून निर्देशनास आणण्याची मदत संघ पदाधिकाऱ्यांनी करावी, अशी गळ संघास घालण्यात आली. कारण संघाशी समन्वय न ठेवल्याने त्याचे परिणाम लोकसभा निवडणुकीत दिसून आल्याचे भाजपने प्रांजळपणे मान्य केल्याचे बैठकीत उपस्थित एका नेत्याने नमूद केले. नंतर विविध स्वरुपात निवडणूक मुद्दे चर्चेत आले. शेवटी एक संघाचा प्रमुख पदाधिकारी व भाजप जिल्हाध्यक्ष हे दोघे निवडणुकीदरम्यान संवाद ठेवतील, असे पक्के ठरले. संघाच्या विविध शाखा म्हणजे वनवासी संघ वगैरे नित्य कार्यरत असतात. या तळपातळीवर काम करणाऱ्या उपशाखा सतत सामान्य लोकांच्या संपर्कात असतात. त्यांची मदत जनतेचा कल जाणून घेण्यास होईल, असा भाजप नेत्यांना विश्वास वाटतो. त्याच अनुषंगाने भाजप संघाच्या दारी गेल्याचे म्हटल्या जाते. यावर भाष्य करण्यास नकार देणाऱ्या जिल्हाध्यक्ष गफाट यांनी अशी समन्वय बैठक झाल्याचे मात्र मान्य केले आहे.

## 'लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सूत्रधार गुजरातच्या तुरुंगात, मग...', बाबा सिद्दीकींच्या हत्येवरून वर्षा गायकवाड यांचा सरकारवर हल्लाबोल!

■ मुंबई : नितीन देवळेकर

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)चे नेते बाबा सिद्दीकी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर इतर दोन आरोपी फरार आहेत. दरम्यान, या घटनेनंतर आता राज्यातील राजकीय वातावरणही चांगलेच तापलं आहे. कायदा सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून विरोधकांकडून शिंदे सरकारला लक्ष्य करण्यात येत आहे. काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनीही ही याप्रकरणावरून सरकारच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले आहेत. इंडिया टीव्ही या वृत्तावाहिनीशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

'ज्याप्रमाणे बाबा सिद्दीकी यांची हत्या झाली आहे, हे दुर्दैवी आहे. योजनाबद्ध पद्धतीने त्यांची हत्या करण्यात आली. हे राज्याचं गृहमंत्रालय तसेच गुप्तचर यंत्रणेचं अपयश आहे. ही घटना घडली तेव्हा काही पोलीस कर्मचारी त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात होते. मग त्यावेळी पोलीस नेमकं करत काय होते? खरं तर मुंबईत १५ दिवसांत ही दुसरी घटना घडली आहे. तर वर्षभरात अशा बऱ्याच घटना घडल्या आहेत. हे पूर्णपण राज्य सरकारचं अपयश आहे', अशी टीका काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

'या घटनेत ज्या टोळीचं नाव पुढे येतं आहे, त्याचा मुख्य व्यक्ती गुजरातमध्ये तुरुंगात आहे. असं असताना




त्याची टोळी नेमकी कोण चालवतं आहे? तो स्वत: तुरुंगातून ही टोळी चालवत असेल, हे गुजरात सरकारचं तसेच केंद्रीय गृहमंत्रालयाचे अपयश नाही का? या टोळीचे फेसबूक पेज नेमकं कोण चालवतं? त्यांच्या फेसबूक पेजवर अद्यापर्यंत बंदी का आणली नाही? असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केलं. तसेच हे सगळं करण्यात सरकार अपयशी ठरत असेल, तर आम्ही सरकारला जाब का विचारायचा नाही', असेही त्या म्हणाल्या. 'आज देशात नेमकं काय सुरू आहे? ना महिला सुरक्षित आहेत, ना शाळेत मुली सुरक्षित आहेत, दर दोनचार दिवसाआड हिट अँण्ड रनचे प्रकरणं पुढे येत आहेत.

## नालासोपाऱ्यात महाविकास आघाडीला उमेदवार मिळेना

■ वसई : सुचिता देशमुख

नालासोपारा मतदार संघातून उमेदवारी मिळविण्यासाठी महायुतीमध्ये चुरस असताना महाविकास आघाडीची मात्र याठिकाणी उमेदवासाठी शोधाशोध सुरू आहे. बदललेल्या राजकीय समीकरणामुळे नालासोपारा जिंकणे कठीण असल्याने महाविकास आघाडीमधील काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट या दोन्ही घटक पक्षांनी हा मतदारसंघ एकमेकांवर ढकलण्यास सुरुवात केली आहे. दोन्ही पक्षांमधून कुणीही उमेदवारी घेण्यास तयार नसल्याची चर्चा असून यामुळे या मतदारसंघात 'कुणी उमेदवारी घेता का?' अशी गत महाविकास आघाडीची झाली आहे. पालघर जिल्ह्यातील सर्वात मोठा आणि बहुचर्चित मतदारसंघ म्हणजे नालासोपारा विधानसभा मतदारसंघ. या मतदारसंघाची मतदारसंख्या ५ लाखांहून अधिक असून सर्वाधिक उत्तर भारतीय मतदार येथे आहेत. बहुजन विकास आघाडीचे क्षितीज ठाकूर हे




विद्यमान आमदार असून मागील ३ निवडणुकीत ते जिंकून आले आहेत. तसा नालासोपारा हा बहुजन विकास आघाडीचा बालेकिल्ला. मात्र २०१९ च्या निवडणुकीत तेव्हाच्या शिवेसना-भाजप युतीच्या प्रदीप शर्मा यांनी त्यांना घाम फोडला होता. तेव्हापासून हा मतदारसंघ भाजपसाठी अनुकूल मानला जात आहे. भाजपाची उत्तर भारतीयांची पारंपरिक मते आणि पक्षाचा झालेला विस्तार यामुळे भाजपाला विजयाची खात्री आहे. त्यामुळे येथून डहाणूचे माजी नगराध्यक्ष भरत राजपूत हे देखील इच्छुक होते. आता बहुजन विकास आघाडीचे कार्याध्यक्ष राजीव पाटील भाजपाच्या वाटेवर आहेत. त्यांनी भाजपाच्या तिकिटावर नालासोपारा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. असे झाल्यास भाजपाचे तगडे उमेदवार राजीव पाटील आणि बहुजन विकास आघाडीचे विद्यमान आमदार क्षितीज ठाकूर हे रिंगणात असतील. समोर अशी तुल्यबळ लढत असताना महाविकास आघाडीच्या गोटात मात्र शांतता आहे.

## शहरातील धूळ प्रदूषणावर मात्रा; वसई विरार महापालिकेची 'फॉग कॅनन' यंत्रणा लवकरच कार्यरत

■ वसई : प्रथमेश चव्हाण

वसई विरार शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी पालिकेकडून पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. यात हवेत उडणारे धुळीकण शोषून त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी पाच फॉग कॅनन यांत्रिक वाहने खरेदी केली आहेत. येत्या आठवडा भरातच ती वाहने धूळ नियंत्रणासाठी रस्त्यावर उतरवली जाणार आहेत. वसई विरार शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढू लागले आहे. रस्त्यावरील वाढती वाहतूक व विविध ठिकाणी सुरू असलेले बांधकामांचे प्रकल्प यामुळे शहरात प्रदूषण वाढू लागले आहे. या वाढत्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर पालिकेकडून आता प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. राष्ट्रीय हवा शुद्धीकरण उपक्रमाच्या अंतर्गत पालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रदूषण कमी करण्यासाठी एकापाठोपाठ एक अशा



उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे.हवेत धुळीकणांचे प्रमाण वाढत असल्याने त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी आता पाच फॉग कॅनन वाहने खरेदी करण्यात आली आहे. यासाठी ३ कोटी २० लाख रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून हवेतील धुळीकण नियंत्रण केले जाणार असून पाण्याच्या अतिसुक्ष्म थेंबांची फवारणी करून हवेतील धुलीकण नियंत्रण केले जाणार आहे.यासाठी या यंत्रामध्ये १० हजार लीटर क्षमतेची पाण्याची टाकी आहे. त्यात पाणी साठवून सूक्ष्म आकाराच्या नोझल्समधून पाण्याची फवारणी वर्दळीचे रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, अंतर्गत रस्ते अशा ठिकाणी करून हवेतील नियंत्रण केली जाणार आहे.तर दुसरीकडे वाढत्या धुळीने दुभाजक , दुभाजकांच्या मध्ये लावण्यात आलेली झाडे ही धुळीने भरून जातात. त्याची या फॉग कॅनन यंत्राच्या द्वारे स्वच्छता करता येणार आहे.अशा प्रकारच्या यंत्रणेमुळे शहरातील प्रदूषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास पालिकेने व्यक्त केला आहे.

## जयंत पाटील यांना घेरण्याचे विरोधकांबरोबरच मित्रपक्षांचेही प्रयत्न

■ सांगली : सतिश सोनावणे

कृष्णा वारणेचे बारमाही पाणी, कसदार जमीन यामुळे सधन असलेल्या वाळवा तालुक्यातील राजकारण राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांच्याभोवतीच गेल्या साडेतीन दशकांपासून केंद्रित झाले आहे. मुख्यमंत्रिपद मिळविण्याची इच्छा त्यांनी कधीही लपवून ठेवलेली नाही. यामुळे मतदारसंघातील विजय आणि तोही मोठ्या फरकाने हवा आहे. तथापि, सर्वोच्च पदाच्या शर्यतीत असल्याने या वेळी त्यांना महायुतीतील विरोधकाबरोबरच स्वपक्षीय व मित्र पक्षातील विरोधकाशी सामना करावा लागणार आहे.

कृष्णा खोऱ्यातील काळी कसदार जमीन ही जशी जमेची बाजू तशीच बारमाही सिंचन सुविधा ही शेती विकासात महत्वाची साधने या तालुक्यात आज निर्माण झालेली पाहण्यास मिळतात. वाळव्याच्या जमिनीत गवताला भाले फुटतात त्या प्रमाणे क्रांतीही अंगात भिनलेली आहे. बंड रक्तातच असल्याने राजकीय दृष्ट्याही हा तालुका सतत चर्चेच्या केंद्रस्थानी राहिला आहे. स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिकारकाना केवळ आश्रयच नव्हते तर जातीने क्रांतीच्या समरात सहभागी झालेले अनेक क्रांतिकारक या वाळव्याने दिले आहेत. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी हे एक त्यातील महत्वाचे नाव म्हणावे लागेल. शिवशाहीर बाबासाहेब देशमुख यांनी या तालुक्याचे नाव जगभर केले. तर आधुनिक काळातील रॉबिनहूड म्हणून आयाबायांना आपला वाटणारा बापू बिरू वाटेगावकर याच तालुक्यातील. आचार्य जावडेकर, प्रा.एन. डी. पाटील आदी पुरोगामी विचारधारा जोपासत लोकचळवळीला बळकटी देणारे याच तालुक्यातील. साहित्यिक क्षेत्रात ज्यांचे नाव घेतल्याविना संस्कृतीचा श्रीगणेशाच होत नाही अशा सरोजिनी बाबर उर्फ अक्का याच तालुक्यातील बागणी गावच्या. खेड्यापाड्यातील महिलांच्या ओठी असलेल्या काव्यधारा, ओव्यांचा खजिना त्यांनी समाजासमोर आणला. मराठीतील मौखिक साहित्याचे सांस्कृतिक संचित त्यांनी आजच्या पिढीसाठी जतन केले. त्यांनीही विधानपरिषदेचे सदस्यत्व



भूषविले. ग्राम्य म्हणून ओळख असलेल्या तमाशाला ज्यांनी विच्छा माझी पुरा करा या वगनाट्याद्वारे लोकनाट्याचा दर्जा मिळवून दिला ते वसंत सबनीस याच मातीतील. अशा या संपन्न तालुक्यात राजकारणही तितकेच तगडे आणि तोला-मोलाचे नसते तर नवलच म्हणावे लागेल. राजारामबापू पाटील, विलासराव शिंदे, नागनाथअण्णा नायकवडी आदींनी या तालुक्याचे प्रतिनिधीत्व केले.

राजारामबापू पाटील यांनी राजकीय नेतृत्व करत असतानाच सहकारातही आपला ठसा उमटवला. साखर कारखानदारी, दूध संस्था, पाणी संस्था या माध्यमातून गाव पातळीपर्यंत आपला संपर्क सतत राहील याची दक्षता घेतली. मात्र, आष्टा शहरात स्व. विलासराव शिंदे यांनी आपले वेगळे राजकीय अस्तित्व कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना राज्य पातळीवर फारशी संधी मिळाली नाही. ती संधी बापूंना मिळाली. धरण खुजगाव की चांदोली यावरून राजारामबापू आणि वसंतदादा पाटील यांच्यातील राजकीय वाद गाजला होता. आजही हा वाद सुप्तावस्थेत सांगलीच्या राजकारणात कधी कधी डोके वर काढतो. मात्र बापूंच्या पश्चात दादांनी आमदार जयंत पाटील यांच्यावर तालुक्याची जबाबदारी सोपवत त्यांच्या राजकीय कर्तबगारीची मुहूर्तमेढ रोवली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## सिडकोची घरे नवी मुंबईबाहेरच, रेल्वे स्थानकाजवळील घरांचे स्वप्न अधुरे

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

सिडको महामंडळ २६ हजारांहून अधिक घरांची सोडत काढणार असून या सोडतीचा मुहूर्त दसऱ्याला म्हणजेच १२ ऑक्टोबर किंवा त्यापूर्वी निघण्याची शक्यता सिडकोच्या सूत्रांनी वर्तविलेली आहे. परंतु या सोडत प्रक्रियेमध्ये दक्षिण नवी मुंबईतील म्हणजे पनवेल परिसरातील सिडको बांधत असलेल्या महागृहनिर्माणातील घरे असल्याने वाशी, जुईनगर, सानपाडा इत्यादी नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील रेल्वे स्थानकाजवळील आणि बसआगाराच्या जागेवर बांधण्यात येणाऱ्या घरांचा समावेश नसल्याने नवी मुंबईत घर खरेदीसाठी इच्छुक असणाऱ्यांचा हिरमोड झाला आहे. त्यामुळे या सोडतीमध्ये हक्काच्या घरासाठी नशीब आजमवणाऱ्यांना खांदेश्वर पूर्व आणि पश्चिम तसेच मानसरोवर



या रेल्वेस्थानकांसोबत तळोजा आणि पनवेल येथील घरे उपलब्ध होणार असल्याची माहिती सिडको मंडळाच्या विश्वसनीय सूत्रांनी दिली.

सिडको महामंडळाची २६,६६७ घरांसाठी सोडत प्रक्रिया काढण्यासाठीची तयारी पूर्ण झाली आहे. विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी या सोडतीची प्रक्रिया सूरू करण्यासंबंधी सर्व हालचाली सिडको मंडळात पुर्ण झाल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये ही सोडत निघावी यासाठी सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट हे आग्रही आहेत. अजूनही मुख्यमंत्र्यांची वेळ सिडको मंडळाला मिळाली नाही. इच्छुकांना अर्ज नोंदणी करताना त्यांच्या आवडीच्या सदनिकेचा प्राधान्यक्रमाने १५ वेगवेगळे सदनिका निवडण्याचे पर्याय (विकल्प) सिडको मंडळ देणार आहे.

## मुंबई महापालिकेच्या सहाय्यक परिचारिका प्रसविका आंदोलनाच्या पवित्र्यात, २५ ऑक्टोबरपासून बेमुदत आंदोलन

■ मुंबई : गणेश बागडे

मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागात कार्यरत असलेल्या सहाय्यक परिचारिका प्रसविकांना ग्रेड पे ४२०० रुपये पूर्वलक्षी प्रभावाने कालबद्ध पदोन्नती लागू करण्याबाबत प्रशासनाकडून दिरंगाई करण्यात येत आहे. त्यामुळे सुमारे ४०० परिचारिकांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. यांसदर्भात परिचारिकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. त्यामुळे याबाबत मुंबई महानगरपालिका शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास २५ ऑक्टोबरपासून बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा या परिचारिकांनी दिला आहे. मुंबईतील प्रत्येक नागरिकाला आरोग्य सेवा पुरविण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये नवजात बालकापासून १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या मुलाचे लसीकरण, हिवताप, डेंग्यू रुग्ण शोधणे, रक्तदाब, मधुमेह, क्षयरोगाचे रुग्ण शोधणे, जन्म, मृत्यू नोंद ठेवणे, गरोदर मातांना मार्गदर्शन करणे, नवविवाहित दाम्पत्यांना कुटुंब नियोजनाची माहिती देणे अशी विविध कामे सहाय्यक परिचारिका प्रसविका आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून करीत असतात. १० हजार लोकसंख्येमागे एक सहाय्यक परिचारिका प्रसविकेची नियुक्ती करण्यात आली आहे. आशा स्वयंसेवक व आरोग्य स्वयंसेविका यांच्या मदतीने या प्रसविका कामाचे नियोजन करतात. मात्र या सहाय्यक



परिचारिका प्रसविकांना मागील सहा वर्षांपासून कालबद्ध पदोन्नती देण्यास मुंबई महानगरपालिका प्रशासने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे सहाय्यक परिचारिका प्रसविकांनी ९ ऑक्टोबर रोजी दि म्युनिसिपल युनियनच्या नेतृत्वाखाली कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या एफ/दक्षिण विभागातील कार्यालयावर मोर्चा काढला होता. दरम्यान, ४२०० रुपये ग्रेड पेनुसार त्वरित योग्य कालबद्ध पदोन्नती देण्याबाबत सामान्य प्रशासनाच्या उप आयुक्तांसोबत लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असे आश्वासन कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शहा यांनी यावेळी शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीमध्ये दिले. शिष्टमंडळामध्ये युनियनचे अध्यक्ष शशांक राव, उपाध्यक्ष रंगनाथ सतावसे, नरेश चौहान, सहाय्यक सरचिटणीस विनायक साळवी आणि परिचारिकांच्या प्रतिनिधींचा सहभाग होता, अशी माहिती दि म्युनिसिपल युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांनी दिली. कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर मुंबई महानगरपालिकेने कालबद्ध पदोन्नती देण्याबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास २५ ऑक्टोबरपासून सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागातील सर्व सहाय्यक परिचारिका प्रसविका बेमुदत आंदोलन करतील, असा इशारा दि म्युनिसिपल युनियनचे अध्यक्ष शशांक राव यांनी दिला.